cmyk

## संपादकीय

### धनखडावरील नामुष्की दुर्दैवाची

संसदीय कामकाजातील कटुतेने शेवटी नवीन कळसाध्याय गाठला आहे. राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असलेले उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या विरोधात विरोधी पक्षीयांनी अविश्वासाचा ठराव मांडला गेला. उपराष्ट्रपतींवर म्हणजेच राज्यसभेच्या विद्यमान अध्यक्षांवर अशा स्वरूपाचा ठराव येण्याची भारतीय संसदेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या खुर्चीसाठी ही नामुष्कीच आहे. हा अविश्वास ठराव संमत होईल की नाही, हा मुद्दा नंतरचा, पण मुळात असा ठराव येण्याची वेळच धनखड यांनी का येऊ दिली यावर अधिक विचार होणे गरजेचे आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना आदरांजली

नवी दिल्ली : २३ वर्षांपूर्वी १३ डिसेंबर २००१ रोजी देशाच्या संसदेवर दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यातील शहीदांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आदरांजली वाहिली. देशातील प्रमुख नेत्यांसह सामान्य जनतेनेही शहिदांना आदरांजली अर्पण केली. राष्ट्रपती द्रौपदी या घटनेच्या आठवणीवर व्यक्त होत म्हणाल्या की, २००१ मध्ये आजच्या दिवशी संसदेची सुरक्षा सांभाळताना जे शहीद झाले त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करते. सर्व शहिदांचे धैर्य आणि निस्वार्थ सेवा आपल्याला सतत प्रेरणादायी आहे. आपला देश त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा मनापासून ऋणी आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२३१ शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

# पीकविमा भरण्यास उरले फक्त दोन दिवस

## सर्व शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन, एक रूपयात उतरविला जातोय विमा

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य शासनामार्फत रब्बी हंगामामध्ये देखील शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजना लागू केली आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कांदा पिकाचा विमा उतरवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर असून, यासाठी आता केवळ दोन दिवस उरले आहेत.**



राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना २०१६–१७ पासून राबवण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२३ पासून महाराष्ट्र शासनामार्फत एक रुपयात पीक विमा योजना लागू केली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. चालू रब्बी हंगाम २०२४–२५ मध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी केंद्र सरकारच्या पीक विमा पोर्टल www.pmfby.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी असे आवाहनही करण्यात आले आहे. महाराष्ट्रात रब्बी हंगामातील गहू, हरभरा तसेच रब्बी कांदा पिकासाठी भाग घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२४ आहे. तर उन्हाळी भात व उन्हाळी भुईमुग या पिकांसाठी ही मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत आहे. गतवर्षी रब्बी हंगाम २०२३–२४ मध्ये विमा योजनेत साधारणता ७१ लाख विमा अर्ज प्राप्त झाले होते. विमा उतरविल्या शेतकऱ्यांना याचा फायदा झालेला आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे. तसेच पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे. नाविन्यपूर्ण आणि सुधारीत मशागतीचे तंत्रज्ञान आणि सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे. कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, ज्यामुळे उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा पिकांचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास आणि स्पर्धात्मकतेत वाढीचा हेतू साध्य होण्यास मदत होईल, ही या योजनेची उद्दिष्ट्ये आहेत. पंतप्रधान खरीप पीक ◀◀ पान २ वर

# संविधानामुळे मिळालेले सुरक्षा कवच तोडण्याचा प्रयत्न

## खा.प्रियंका गांधी यांचा सरकारवर घणाघात

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारताचे संविधान आमचे सुरक्षा कवच आहे, संविधान जनतेला सुरक्षेची हमी देते. त्यामुळे जनतेला न्याय, एकता, आर्थिक संरक्षण मिळाले आहे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी हे सुरक्षा कवच तोडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, खासगीकरण करून आरक्षण कमकुवत करण्याचे काम सुरू आहे, असा घणाघाती आरोप काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी शुक्रवारी (दि.१३) लोकसभेतील आपल्या पहिल्या भाषणात केला.**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात भारतीय राज्यघटना स्वीकारल्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त लोकसभेत चर्चा करताना त्या बोलत होत्या. गांधी पुढे म्हणाल्या की, भारताला चर्चा आणि संवादाची परंपरा आहे. परंतु, सत्ताधारी जनतेच्या प्रश्नावर चर्चा करण्यास तयार नाही. लोकसभा निवडणुकीत असा निकाल लागला नसता, तर सत्ताधाऱ्यांनी संविधान बदलेले असते, असाही आरोप त्यांनी यावेळी केला. संविधानामुळे महिलांना लढण्याची हिंमत मिळते. त्यामुळे संविधान बदल्याची भाषा जनता सहन करणार नाही, असा इशारा गांधी यांनी यावेळी दिला. खासगीकरणाच्या माध्यमातून ◀◀ पान २ वर

### सगळी जबाबदारी पंडीत नेहरू यांची तर मग तुमची काय ?

देशाच्या स्वातंत्र्यापासून ते स्वातंत्र्यानंतर या देशातील जनतेच्या विकासासंदर्भात ज्या व्यक्तीने घेतलेली भूमिका आणि त्याने केलेली कामे जनतेला माहित आहेत. त्या व्यक्तीने देशाच्या भविष्यासाठी आयआयएम, आयआयटी, एम्स, गेल, भेल यासारख्या असंख्य संस्था उभ्या केल्या. त्या व्यक्तीचे नाव पुसून टाकण्याचे काम आणि त्यांचे नाव कायमच्या विस्मरणात ढकलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सत्तापक्षाला कायम भूतकाळात राहण्याची सवय आहे. १९३० ला काय झाले, ह्या वेळी काय झाले, पण ते वर्तमानात रहात नाहीत. परंतु सत्ता पक्षाने आता वर्तमानात आज काय स्थिती आहे यावर बोलावे असा खोचक टोला भाजपाचे नाव न घेता प्रियंका गांधी यांनी लगावला. सगळ्या गोष्टींसाठी जर पंडीत नेहरू जबाबदार असतील तर मग तुमची जबाबदारी काय ? असा खोचक सवाल काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी केला.



### कुंभमेळ्यासाठी पंतप्रधानांकडून ५ हजार ७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन



**प्रयागराज । वृतसंस्था**

**महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम आहे. प्रयागमध्ये प्रत्येक पायरीवर पवित्र स्थाने आहेत. महाकुंभाच्या भव्य दिव्य यशस्वितेसाठी हार्दिक शुभेच्छा. २०१९ मध्ये युनेस्कोने महाकुंभला अमूर्त हेरिटेजचा दर्जा दिला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयागराजमध्ये केले. शुक्रवारी तीर्थराज प्रयागराजच्या पवित्र भूमीवरील त्रिवेणी संगमावर मोदींनी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी ५ हजार ७०० कोटी रुपयांच्या १६७ प्रकल्पांचे उद्घाटन केले.**

महाकुंभासाठी ९ नवीन घाट, ३००० नवीन गाड्या, तीन लाख रोपे लावली जात आहेत. ४००० हेक्टरमध्ये ३०० उद्यानांचे ◀◀ पान २ वर

## मुहूर्त ठरला ! मंत्रिमंडळाचा शपथविधी १५ डिसेंबरला निश्चित

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकला असला तरी आता सर्वांच्या नजरा महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्ताराकडे लागल्या होत्या. जुन्या मंत्र्यांना हटवून नवे चेहरे आणण्याची रणनीती सुरू झाली होती. यातच अनेक बड्या नेत्यांचा पत्ता कट करून नव्यांना संधी देणार असल्याचे समोर आले होते. मात्र हा महायुतीचा मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार हा प्रश्न सर्वांनाच होता. मात्र आता मुहूर्त ठरला असून, १५ डिसेंबरला ◀◀ पान २ वर



### नागपूरमध्ये होणार शपथविधी

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी नागपुरात रविवारी दुपारी ३.०० वाजता होणार असल्याचे समजते. त्या संदर्भात राजभवनात तयारीही सुरू झाल्याची माहिती आहे. राज्यातील फडणवीस सरकारचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होत आहे. त्यामुळे, आमदारांच्या सोईसाठी हा शपथविधी १५ तारखेला नागपुरात होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत असून तयारी सुरू झाल्याची माहिती आहे.

# बीड जिल्हा बंदला मोठा प्रतिसाद!

## संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सीआयडीकडे वर्ग

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा दोन दिवसांपूर्वी अत्यंत निर्दयीपणे खून करण्यात आला. या हत्येच्या निषेधार्थ आणि मुख्य सूत्रधाराला अटक करण्याच्या मागणीसाठी बीड जिल्हा बंद चे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर रोजी बीड जिल्ह्यात बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी १००% बंद पाळून आपला निषेध व्यक्त केला. संपूर्ण जिल्ह्यामध्ये हा बंद १००% यशस्वी झाला. दरम्यान, बंद दरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडला नसून, जिल्हा पोलीस प्रशासनाने ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला होता. दुसरीकडे संतोष देशमुख यांच्या खुनाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे.**



बीडः आ.संदिप क्षीरसागर यांनी शहरातून रॅली काढत नागरिकांना बंदचे आवाहन केले.

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांचे डोनगाव फाट्याच्या पुढे असलेल्या टोलनाक्या जवळ आरोपी सुदर्शन घुले रा. टाकळी ता. केज याने त्याच्या साथीदारासह अपहरण केले आणि नंतर संतोष देशमुख यांचा खुन करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. १२

सविस्तर वृत्त पान ६ वर

डिसेंबर रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशाने सदरचा गुन्हा गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी दिली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी जयराम माणिक चाटे (वय २१ वर्षे रा. तांबवा ता.केज), महेश सखाराम केदार (वय २१ वर्षे रा. मैंदवाडी ता.धारुर), प्रतिक भिमराव घुले या आरोपिंना अटक करण्यात आली आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड : १८.०० क्विंटल | १,९८१ | २,४०० | २,१५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,०४१ | ४,३३० | ३,५११ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ३,९६६ | ४,०२० | ३,९९१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# गुज्जर खानसह १२ जणांना जन्मठेप

## शिक्षक साजेद अली खून प्रकरणात बीडच्या मोक्का न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षक साजेद अली खून प्रकरणात बीड येथील विशेष मोक्का न्यायालयाने दोषी ठरवलेल्या १४ आरोपींपैकी गुज्जर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान याच्यासह १२ आरोपींना अजन्म कारावास म्हणजेच जन्मठेपेची शिक्षा ठोठावली ◀◀ पान २ वर

### या १२ जणांना जन्मठेप

अन्वर खान उर्फ गुजर खान मिट्टा खान (रा. गुलशन नगर बालेपीर बीड), मुजीब खान मिर्झा खान पठाण, सय्यद नासेर सम्यद नुपुर सम्बद शाहरूख सय्यद नुर, शेख उवेद शेख वायु, शेख सरफराज उर्फ डॉन, शेख शहवाज शेख कलीम (रा. रोशनपुरा बीड), शेख अमर शेख अकबर (रा. गुलशन नगर बीड), शेख बब्बर शेख युसूफ (रा.खासबाग बीड), आवेज काझी (रा. बालेपीर बीड), शेख इम्रान उर्फ काला शेख रशीद (रा. काझी नगर बालेपीर बीड), शेख महाहर उर्फ काल्या उर्फ हाफ मर्डर शेख रहीम या बारा जणांना अजन्म कारावास म्हणजेच जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

### परीक्षा देताना विद्यार्थ्याचा हृदयविकाराने मृत्यू

बीड प्रतिनिधी

शहरातील केएसके महाविद्यालयामध्ये बीएससी तृतीय वर्षाच्या (वय २२) विद्यार्थ्याचा परीक्षा देताना हृदयविकाराचा झटका आला. त्यास जिल्हा रुणालयात दाखल करण्यात आले मात्र डॉक्टरांनी तपासणी करुन त्यास मृत घोषित केले. कोरोनाच्या नंतर हृदयविकाराच्या झटक्याने मृत्युचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हृदयविकाराने तरुणांनाही आपल्या कवेत घेतले असल्याने ही चिंतेची बाब ठरत आहे. ◀◀ पान २ वर

# राज्याला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार–मुख्यमंत्री


## वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करु, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बीकेसी, वांद्रे येथे १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, या परिषदेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक ◀◀ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# धनखडावरील नामुष्की दुर्दैवाची

संसदीय कामकाजातील कटुतेने शेवटी नवीन कळसाध्याय गाठला आहे. राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असलेले उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या विरोधात विरोधी पक्षीयांनी अविश्वासाचा ठराव मांडला गेला. उपराष्ट्रपतींवर म्हणजेच राज्यसभेच्या विद्यमान अध्यक्षांवर अशा स्वरूपाचा ठराव येण्याची भारतीय संसदेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या खुर्चीसाठी ही नामुष्कीच आहे. हा अविश्वास ठराव संमत होईल की नाही, हा मुद्दा नंतरचा, पण मुळात असा ठराव येण्याची वेळच धनखड यांनी का येऊ दिली यावर अधिक विचार होणे गरजेचे आहे. धनखड उपराष्ट्रपती झाल्यापासून त्यांनी राज्यसभेत विरोधकांची पद्धतशीर कोंडी करून त्यांची सतत मुस्कटदाबी केली असा त्यांच्यावरचा आरोप आहे.

जो कोणी दूरदर्शनवरील राज्यसभेचे कामकाज पाहतो, त्याच्या नजरेला ही बाब सहजपणे येऊ शकते. विरोधकांचे माइक बंद करणे, विरोधकांचे नेते बोलत असताना सतत स्वतःच त्यात अडथळे आणणे, अनेक वेळेला त्यांना बोलण्याची परवानगीच नाकारणे, त्यांनी दाखल केलेले तहकुबी प्रस्ताव सरसकट फेटाळणे आणि सरसकट विरोधी पक्षांच्या सभासदांना निलंबित करणे असे प्रकार धनखड यांच्याकडून वारंवार झाले आहेत. अगदी ताजी गोष्ट सांगायची तर भाजपचे नेते जे. पी. नड्डा यांनी सोरोस प्रकरणावरून काल राज्यसभेत भाषण केले. त्यांना १३ मिनिटे धनखड यांनी विनाअडथळा बोलू दिले, पण त्याच्या उत्तरात उभे राहिलेले मल्लिकार्जुन खर्गे यांना एक मिनिटही नीट बोलता आले नाही, त्यांचा माइक लगेच बंद केला गेला अशी त्यांची तक्रार आहे. राज्यसभेच्या कामकाजाचे जे प्रसारण होते ते पाहिल्यानंतर असे दिसून येते की धनखड यांनी विरोधकांना मनमोकळेपणाने मते मांडू द्यायला कधीच अनुमती दिली नाही.

विरोधकांकडून आरोप झाल्यानंतर त्यात सरकारकडून हस्तक्षेप किंवा आक्षेप होण्याआधी, धनखड हेच विरोधी सदस्यांना कायम दटावत असल्याचे पाहायला मिळाले आहे. विरोधकांनी कुठलाही मुद्दा मांडल्यानंतर, तुमच्याकडे काय पुरावा आहे, अशी विचारणा धनकड सातत्याने करीत राहिले आहेत. हा प्रकार एक दोनदा नव्हे तर त्यांच्याकडून सुरुवातीपासूनच सुरू आहे. विरोधकांच्या म्हणण्याच्या नोंदी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याचा सपाटाच त्यांनी लावला होता. कामकाजाच्या वेळी अमुक एखादा मुद्दा रेकार्डवर घेऊ नका असे सांगण्याचा राज्यसभा अध्यक्षांना अधिकार असतो, पण कामकाज संपल्यानंतरही या नोंदी परस्पर गाळल्या गेल्याची विरोधकांची तक्रार आहे. त्याबाबत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून अध्यक्षांच्या विरोधात स्पष्टपणे नाराजी नोंदवली गेली आहे, पण त्याची धनखड यांनी कधीच फिकीर केलेली दिसली नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर आम्हाला जड मनाने हा अविश्वास प्रस्ताव आणावा लागत असल्याची भूमिका काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी स्पष्ट केली. दीर्घकाळच्या संसदीय कारकिर्दीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून कायमच उच्च संसदीय प्रथांचे पालन केले जाते. 'सदन की गरिमा' असा शब्दप्रयोग संसदीय कामकाजात नेहमी ऐकायला मिळतो. संसद की गरिमा, म्हणजे संसदेची प्रतिष्ठा आणि गौरव कायम राखण्याला दोन्ही बाजूंनी सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित असते. त्यामुळेच धनखड यांच्या सततच्या पक्षपाती भूमिकेवर आतापर्यंत विरोधी पक्षाने अविश्वास प्रस्तावाचे हत्यार थेट उपसले नव्हते.

पण पाणी डोक्यावरून जात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनाही हा शेवटचा उपाय करावा लागला. राज्यसभेचे संख्याबळ २४५ इतके आहे. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे १२१ सदस्य आहेत. बहुमतासाठी त्यांना केवळ दोन सदस्य कमी असले तरी, ही कमी ते अन्य पक्षांच्या मदतीने सहज भरून काढू शकतात. त्यामुळे विरोधकांनी आणलेला हा अविश्वास प्रस्ताव संख्याबळाच्या आधारे फेटाळणे भाजपला अवघड नाही. पण असा प्रस्ताव दाखल होणे आणि त्यावर सभागृहात चर्चा होणे यातून राज्यसभा अध्यक्षपदाची शान कमी होणार आहे, ही बाब ध्यानात घेणे गरजेचे आहे. धनखड हे उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष होण्यापूर्वी पश्चिम बंगालमध्ये राज्यपाल होते. तेथेही त्यांनी आपल्या पदाचा एकतर्फी वापर करून पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारला बेजार केले होते. त्याचीच बक्षिसी म्हणून त्यांना हे उपराष्ट्रपतीपद दिले गेले अशी वदंता आहे. हा मुद्दा कितपत खरा याविषयी वाद होऊ शकतात, परंतु राज्यसभेत सत्ताधारी पक्षाकडे पाशवी बहुमत नाही, त्यामुळे तेथील दोलायमान परिस्थितीवर खमका अध्यक्ष असणे गरजेचे होते. ही सरकारची गरज भागवण्यासाठीच धनखड यांना या पदावर आणले गेले असावे असे म्हणण्यास खूप वाव आहे. धनखड यांनी त्या बरहुकूमच आपला कारभार चालू केला आहे, असे म्हणता येऊ शकते. संसदेतल्या कामकाजाविषयी सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येत नाही. संसदेचा पीठासीन अधिकारीसुद्धा त्यांना दाद देत नसेल, तर मग शेवटी संसदीय आयुध उगारावे लागते. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आता हे आयुध उगारले आहे. धनखड यांच्या विरोधात जो अविश्वास प्रस्ताव दाखल केला गेला आहे, त्यावर इंडिया आघाडीच्या तब्बल ६० खासदारांच्या सह्या आहेत. इतक्या मोठ्या सदस्यांचा अध्यक्ष धनखड यांच्यावर विश्वास नसणे हे त्यांच्यासाठी खचितच भूषणावह नाही.

## देशद्रोहाचा खटला दाखल करा यासाठी अंबड बंद पाळून तहसीलदारांना निवेदन

अंबड । प्रतिनिधी

परभणी येथील घडलेल्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबने संदर्भात निषेध व्यक्त करत आज अंबड बंद पाळून अंबड तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनात म्हटले की दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथील रेल्वे स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान काही समाजकंटकांनी केला आहे.



या घटनेवरून अवमान करणाऱ्याची मनुवादी मानसिकता किती संविधान विरोधी आहे हे लक्षात येते त्या व्यक्तीला संविधानाप्रती प्रचंड घृणा आहे असं लक्षात येत आहे. आपला देश हा संविधानावर चालतो संविधानाचे मूल्य, तत्त्व या गोष्टी प्रत्येक नागरिकांनी आत्मसात करणे संविधानामध्ये किती मोठ्या प्रमाणात छेडछाड होण्याची शक्यता आहे. एकीकडे राज्यामध्ये राज्य सरकार 'घर घर संविधान' ही संकल्प राबवण्याचा विचार करत असताना अशा घटना घडणे अत्यंत निंदनीय आहे यामुळे समाजात दुही माजवण्याचा प्रयत्न होतोय का ? हा प्रश्न उभा राहत आहे. म्हणून संबंधित व्यक्तीवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा अशी मागणी साठी आज अंबड तहसील कार्यालयावर मोर्चा करण्यात आला होता हा मोर्चा अंबड शहरातील आंबेडकर नगर येथून सुरुवात होऊन मुख्य रस्त्या मार्गाने हा मोर्चा तहसील कार्यालयावर नेण्यात आला यावेळी सर्व समाज व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी कार्यकर्ते व्यापारी यावेळी यांच्यासह सर्वांची उपस्थिती होती मोर्चातील नागरिकांच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या पूर्ण कराव्या. आणि यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची काळजी घेण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभी करण्यात यावी त्याचबरोबर संविधानाचे मूल्य जनमाणसात कसे रुजवता येतील याची काळजी घेण्यात यावे.

# श्री योगेश्वरी देवीच्या मंदीरात सहा हजार आराधी मंडळाची मांदियाळी

## मंदिरात बसलेल्या आराध मंडळांची मंदिर प्रशासनाकडून चोख व्यवस्था

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत संपन्न होत आहे. या महोत्सवात केवळ अंबाजोगाई तालुकाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन देवीच्या मंदिरात बसण्यासाठी आराध मंडळ येत असते. यावर्षी देखील ५ ते ६ हजार आराध मंडळ देवीच्या मंदिरात बसले आहे. या सर्व भक्त मंडळींची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची काळजी मंदिर प्रशासनाने घेतील असल्याचे देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच सचिव अशोक लोमटे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.**

यावर्षीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर रोजी वर्णी महापूजेने तहसीलदार विलास तरंगे यांच्या हस्ते योगेश्वरी देवीची विधीवत महापूजा करून प्रारंभ झाला. याच दिवसापासून मंदिरात आराध बसण्यासाठी महिलांची सुरुवात होते. मात्र मार्गशीर्ष। एकादशीपासून पाच दिवसासाठी देवीच्या मंदिरात आराध मंडळीची मोठी गर्दी होत असते.यावर्षी ५ ते ६ हजार आराध मंडळ बसले आहेत. या सर्व भाविकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकडे मंदिर प्रशासन सज्ज आहे. या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवादारम्यान मंदिरात सलग नऊ दिवस वेगवेगळे धर्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ज्यामध्ये सुप्रसिद्ध शाहीर व भारुडकार नंदेश उमप यांचा भारुडाचा कार्यक्रम, रामयनाचार्य ह भ प ढोक महाराज यांचे कीर्तन, गायकवाड भगिनींच्या अभंगवाणी चे कार्यक्रम हे व असे दैनंदिन विविध प्रकारचे कार्यक्रम या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवात संपन्न होत आहेत. मंदिरातील विविध उपक्रमांना आराध मंडळ तसेच अंबाजोगाई पंचक्रोशीतील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आलेल्या व येणाऱ्या भावीक भक्तांसाठी सर्व सुवीधा देण्यासाठी मंदीर प्रशासन कटिबद्ध आसल्याचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी व सचीव लोमटे यांनी सांगितलेआहे.



अंबाजोगाईचे ग्रामदैवत श्री योगेश्वरी देवीचा दसऱ्याच्या वेळी नवरात्र व मार्गशीर्ष महोत्सव साजरा केला जातो. नवरात्रात व मार्गशीर्ष महोत्सवात देवल कमीटीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे अयोजन केले जाते. आई राजा ऊदोऊदो , अंबाबाईचा उदो उदो या जयघोषाणे व आराध्याच्या झांज व संबळाच्या आवाजाने मंदीर परीसर दुमदूमून जातो. यावर्षी श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होत आहे. रविवारी सकाळी वर्णी महापूजेने मार्गशीर्ष महोत्सवास प्रारंभ तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांच्या योगेश्वरी देवीची विधीवत वर्णी महापूजेने या महोत्सवास प्रारंभ करण्यात झाला.मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग ९ दिवस आराध बसण्याची परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. तीच परंपरा आजही सुरुच असुन यामध्ये पुरुष व महीला भावीक ९ तसेच ५ दिवस आराध म्हणून बसतात. त्यात सर्वाधीक महीलाची उपस्थिती असते. पाच ते सहा हजाराच्या जवळपास आराध म्हणून माहिला बसल्या आहेत.श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या वतीने आराध बसणाऱ्या महिलांसाठी आसण व्यवस्था निवासी असलेल्या महिलांसाठी चहा,फराळ, जेवण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आंघोळीची त्याचबरोबर सुलभ शौचालयाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे. मंदिर परिसरात मोठा मंडप देण्यात आला असून महिलांना सर्व सोयी व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महोत्सवात मंदिर परिसरात दररोज विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम संपन्न होत आहेत. यात आराधी मेळा,संगीत भजन,कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचे सादरीकरण सुरू आसुन पारंपारिक कला प्रकारांच्या सादरीकरणाने भाविकांना भारावून टाकले आहे. मंदिरात सुरू असणाऱ्या कार्यक्रमांना महिलांची मोठी गर्दी झाली आसुन आराध बसलेल्या भावीकांची नोंद करुण त्यांना सुखसुवीधा देण्यासाठी पास देण्यात येत आहेत. मंदिरात येणाऱ्या भावीक भक्तांसाठी सर्व सुवीधा पुरविण्याचा प्रयत्न मंदीर प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असून या सर्व बाबींवर देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी , सचिव अशोक लोमटे, सहसचिव संजय भोसले, कोषाध्यक्ष विद्याधर पांडे यांच्यासह संपूर्ण देवल कमिटीचे सदस्य बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# देवदहिफळ यात्रेत एचआयव्ही तपासणी शिबिर

## ग्रामीण रुग्णालयाचा भाविकांसाठी अनोखा उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व ग्रामीण रुग्णालय धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने देवदहिफळ येथे ७७ महिला व पुरुषांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली. एच आय व्ही बाबत जनजागृती करण्यासोबतच मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी खंडोबा यात्रेसाठी आलेल्या अनेक भाविकांनी आपली तपासणी करून घेतली.**



ग्रामीण रुग्णालय धारूर व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देवदहिफळ येथील यात्रेमध्ये एच आय व्ही एकात्मिक मोफत सल्ला व चाचणी केंद्र उघडण्यात आले होते. यावेळी अनेक महिला पुरुषांची रक्त तपासणी करून त्यांना एचआयव्ही संदर्भात मोफत समुपदेशन करण्यात आले. एच.आय.व्ही. हा आजार होण्याची कारणे तसेच त्यावरील उपचार याबाबत यावेळी जनजागृती करण्यात आली. एच आय व्ही हा संसर्गजन्य रोग नसून त्यावर गरजेप्रमाणे संदर्भ सेवा देण्यात येते. जिल्ह्यातील प्रत्येक सरकारी रुग्णालयात आयसीटीसी (एचआयव्ही तपासणी केंद्र) सेंटर उघडण्यात आले आहेत. त्यामध्ये तपासणी केल्यानंतर रुग्ण व आजार या बाबत सर्व प्रकारची गोपनियता पाळली जाते. हा आजार उपचाराने बरा होत असल्यामुळे बाधित रुग्णांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे प्रशा वैद्यकीय अधिकारी राजेश जाधव यांनी सांगितले. सदरील उपक्रम धारूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शशांक वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. प्रशा वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश जाधव, समुपदेशक प्रेमानंद स्वामी, ग्रामीण विकास मंडळच्या लिंक वर्कर शितल वड्डे , सुपरवायझर वाल्मीक पाईक, लिंक वर्कर अश्विनकुमार डावरे यांनी यशस्वी शिबिर यशस्वीपणे पार पाडले.

# गुटखा वाहतुक करणारे वाहनासह एक कोटीचा मुद्येमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात अवैध गुटखा वाहतुक व विक्री करणारे संबंधी माहिती घेऊन कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री अजय कुमार बसंल, यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सूचना दिल्या होत्या.**

त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव स्वागुशा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्थागुशाचे वेगवेगळे पथक तयार करुन कारवाई करण्यासाठी मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्री ०१.१० वाजेच्या सुमारास पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत कंडवंची शिवरात समृध्दी महामार्गावर स्थानिक गुन्हे शाखा येथील पथक हे पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना समृध्दी महामार्गाने मेहकर कडून छत्रपती संभाजीनगर कडे एक संशईत कंटेनर जातांना दिसले. पथकातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी सदर कंटेनर थांबुन कंटेनर चालकाकडे विचारपुस केली असता, त्याने प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यास अधिक विश्वासात घेऊन विचारपुस करता कंटेनर मध्ये गुटखा असल्याचे सांगितलने पथकातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी कंटेनर चालकास कंटेनर सह ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्या मध्ये एकुण १८० भोद मध्ये ७७,११,२००/- रुपये किमंती मानवी आरोग्यास घातक असलेला प्रतिबंधीत असलेला बाजीराव सुगंधी पान मसाला गुटखा व टॅब्याको चे पॉकिटे २५ लाख रुपये किंमतीचे कंटेनर सह जप्त केले असून, कंटेनर चालक इरफान रहीम सय्यद वय ३६ वर्षे, रा.पुंडलिक नगर हुसेन कॉलनी गल्ली नं ५ छत्रपती संभाजीनगर व इतर दोन असे एकूण तीन आरोपीतां विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे पुढील कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे.



सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बसंल, यांचे मार्गदर्शनाखाली श्री, पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा योगेश उबाळे सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार सॅम्युअल कांबळे, राम पव्हरे, प्रशांत लोखंडे, सागर बाविस्कर, योगेश सहाने, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर चालक सौरभ मुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### पीकविमा भरण्यास

विमा योजनेत १ रुपयामध्ये पीक विमा उतरवण्याची संधी शेतकऱ्यांना देण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या हिश्शाचा प्रिमीयम राज्य सरकारने भरला होता. दरम्यान, कृषी विभाग आणि विमा कंपीनीने यातील अनेक बनावट प्रकार समोर आणले आहेत. खरीप हंगाम २०२३ पासून महाराष्ट्र शासनामार्फत एक रुपयात पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

------------

### कुंभमेळ्यासाठी पंतप्रधानांकडून ५ हजार

नूतनीकरण केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे पोहोचून संगमच्या काठावर प्रार्थना केली. २०२५ च्या महाकुंभासाठी सुविधा सुधारणे आणि शहराच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशाने ५,५०० कोटी रुपयांचे मोठे विकास प्रकल्प सुरू करण्यापूर्वी पंतप्रधानांनी संगम बँकांवर प्रार्थना केली. मोदींच्या दौऱ्याची सुरुवात गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर विधीवत पूजा आणि दर्शनाने झाली. पूजेपूर्वी मोदींनी नदीत बोटिंगचा आनंद लुटला. पूजेला पंतप्रधानांसह उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही उपस्थित होते. दर १२ वर्षांनी आयोजित केला जाणारा महाकुंभ पुढील वर्षी १३ जानेवारी (पौष पौर्णिमा) ते २६ फेब्रुवारी (महा शिवरात्री) या कालावधीत प्रयागराजमध्ये आयोजित केला जाईल.

----------

### संविधानामुळे मिळालेले सुरक्षा

हे सरकार आरक्षण कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहे. लोकसभा निवडणुकीचे असे निकाल लागले नसते, तर त्यांनी संविधान बदलण्याचे कामही सुरू केले असते. ते वारंवार संविधानाबद्दल बोलत आहेत, कारण या निवडणुकांमधून त्यांना कळून चुकले आहे की, या देशाची जनता जिंकत असताना संविधान सुरक्षित ठेवेल. या निवडणुका जवळजवळ हरल्याने त्यांना हे समजले आहे की संविधान बदलण्याच्या चर्चा या देशात चालणार नाहीत. प्रियंका गांधी म्हणाल्या की, आपले संविधान सुरक्षा कवच आहे. अशी सुरक्षा कवच जी नागरिकांना सुरक्षित ठेवते. ते न्यायाचे, एकतेचे कवच आहे. हे खेदजनक आहे की मागील १० वर्षात सत्ताधारी पक्षाच्या सहकाऱ्यांनी हे मोडून काढण्याचे सर्व प्रयत्न केले. हे कवच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे वचन देते. काँग्रेस सरकारच्या काळात जनतेला शिक्षण, अन्न, रोजगार मिळविण्याचा अधिकार मिळाला. देशातील कुणाची काय परिस्थिती आहे, हे समजण्यासाठी जात जनगणना होणे आवश्यक आहे, ही जनतेचीही मागणी आहे, असेही त्या म्हणाल्या.

------------

### मुहूर्त ठरला ! मंत्रिमंडळाचा

महायुतीचा मंत्रिमंडळ विस्तार निश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची स्वतंत्रपणे दिल्लीत भेट घेतली. यानंतर नवीन मंत्र्यांच्या शपथविधीची तारीख १५ डिसेंबर निश्चित करण्यात आली. महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत त्याआधी नव्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. अशा स्थितीत सरकारमध्ये एकूण ४३ मंत्र्यांचा समावेश होऊ शकतो. पक्षनिहाय पाहिले तर भाजपला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ तर राष्ट्रवादीला (अजित) ४१ जागा मिळाल्या. पक्षाने जिंकलेल्या जागांच्या हिशोबाने भाजप २१ मंत्रालये स्वतःकडे ठेवू शकते. अजित गटाला १० आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १२ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे.

---------

### परीक्षा देताना विद्यार्थ्याचा

शुक्रवारी (दि.१३) रोजी शहरातील केएसके महाविद्यालय येथे बीएससी तृतीय वर्षाचा विद्यार्थी सिद्धांत राजाभाऊ मासाळ (रा. एकतानगर,बीड) हा परीक्षा देण्यासाठी आला होता. तो परीक्षा हॉलमध्ये कोसळला त्यास प्राध्यापक आणि प्राचार्य यांनी तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणी करून मृत्यू झाल्याचे घोषित केले. अवघ्या २२ वर्षाच्या सिद्धांतचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

-----------

### गुज्जर खानसह १२

आहे. उर्वरित दोघांपैकी एकाला पाच वर्षाचा कारावास व पाच लाख रूपये दंडाची तर दुसऱ्याला सहा महिन्याचा कारावास व पाचशे रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. या शिक्षेच्या सुनावणीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. विशेष मोक्का न्यायालयाने प्रथमच एवढ्या आरोपींना एकाचवेळी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. बीड शहरातील बालेपीर भागात १९ सप्टेंबर २०१९ रोजी सैनिकी विद्यालयातील शिक्षक सय्यद साजेद अली (वय ३८) यांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात एकूण १८ आरोपींविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता. या प्रकरणात बीडच्या विशेष मोक्का न्यायालयाने १८ पैकी १४ जणांना दोषी ठरवले होते. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत विशेष मोक्का न्यायालयाच्या न्यायाधीश सुरेखा पाटील यांनी १४ पैकी १२ आरोपींना वेगवेगळ्या कलमांतर्गत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे तर बब्बर खान गुलमोहम्मद खान (वय २८ रा. शहेबाज कॉलनी नेकनूर) यास आरोपी फरार होण्यास मदत केल्याप्रकरणी दोषी ठरवून पाच वर्ष कारावास आणि पाच लाख रूपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अधिक तीन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात विशेष सरकारी वकील ॲड. अजय तांदळे यांनी काम पाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकील व सर्व सहाय्यक सरकारी वकील यांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस अधिक्षक कार्यालयातील पो.उपनि.बी.बी. जायभाये, दोषसिध्द कक्षातील पो.ह.बी.बी.शिंदे, अंमळनेर ठाण्यातील पोह. एस.बी. तरटे, पोह. जी.एम. परझणे, पोलीस अधिक्षक कार्यालयातील आरसीपी पोह. एन. डी. भोसले, शिवाजीनगर ठाण्याचे पोउपनि. एस.पी. वाघमारे यांनी काम पाहिले. तरटे आणि भोसले यांनी विशेष सरकारी वकील यांना सदर प्रकरणात मदत केली.

---------

### महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर

परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृती मध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो मात्र आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो ? परंतु देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत असे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे जात आहे. महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा अभ्यास करुन यावर आधारित महाराष्ट्राच्या विकासाची धोरणे आखली जात आहेत. जागतिक पातळीवर महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे. यामध्ये लॉजिस्टिक धोरण, सर्वाधिक गतिमान रस्त्यांचे जाळे बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर – मुंबई समृद्धी महामार्ग ७०० किलोमीटर असून जो १६ जिल्ह्यांना जोडला आहे. हा महामार्ग थेट जेएनपीटी या बंदराला जोडला आहे, यातून अत्यंत चांगल्या पुरवठादारांची साखळी निर्माण होत आहे. रस्ते, विमान वाहतूक, बंदर विकास या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर राज्य शासन भर देत आहे. देशासोबतच महाराष्ट्राला मेरीटाईमची ताकद बनवण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ध्यास आहे. सन २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाला गती दिली असल्याचेही यावेळी सांगितले. सन २०२० च्या देशपातळीवरील विकास सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र देशात भूजल पातळी मध्ये देखील प्रथम होते. राज्यातील वनांचे आच्छादन देखील जास्त आहे. ग्रीन ऊर्जा, नदीजोड प्रकल्प यातून शाश्वत विकासावरती राज्य शासन भर देत आहे असेही यावेळी ते म्हणाले. यावेळी प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै म्हणाले की, देशामध्ये उपलब्ध मनुष्यबळ हे आपल्या विकासाचे बलस्थान आहे. विकसित भारत हेच भारताचे भवितव्य आहे. भारतीय संस्कृती हा विचार आहे तो जगात पुढे नेणे गरजेचे आहे. युवांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणे, आरोग्य, शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, महिला सबलीकरण यावरती काम होणे गरजेचे आहे.

----------


### टी.सी.हरवला आहे

विश्वजीत शरद रेडेकर या नावाचा १० वी पासचा टी.सी आष्टी ते कडा बस प्रवासात हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क साधावा.

::: संपर्क :::

मो. ९०७५५४३४४८

## परभणी येथील घटनेचा निषेध; प्रमुख्य सूत्रधारकाला अटक करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा –डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरमची मागणी

बीड : परभणी येथील संविधानाच्या प्रतिमेची विटंबना केल्या प्रकरणी प्रमुख्य सूत्रधारकाला अटक करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे आणि अटक करण्यात आलेल्या आंबेडकरवादी कार्यकार्ता वरील दाखल गुन्हे मागे, घेण्यात यावे या मागणीसाठी बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरम च्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले.

परभणी येतील संविधानाची विटंबना करण्यात आली यांचा निषेध करण्यासाठी संविधान समर्थकांनी लोकशाही मार्गाने अंदोलन केले. या आदोलन करणाऱ्या लोकवरती पोलीसांनी अमानुष पणे लाठीचार्ज केला व त्यांना अटक करण्यात आलेली आहे, अमानुष पणे लाठीचार्ज करणाऱ्या पोलीसावर गुन्हे दाखल करून कडक कार्यवाही करावी तसेच आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यावरील गुन्हे मागे घेण्यात यावे व संविधानाची विटंबना करणाऱ्या मांगील सुत्रधारला तात्काळ अटक करावी, असे निवदेन डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉयर्स सोशल फोरम, बीड वनीचे देण्यात झाली यावेळी फोरमचे अध्यक्ष ॲड.राहुल साळवे, ॲड . सदानंद वाघमारे, ॲड.धीरजकुमार कांबळे, ॲड. गौतम कडेकर, ॲड. सुनील वडमारे, ॲड. अशोक वाघमारे, ॲड. रामानद कोरडे, ॲड. सत्यनारायन ढाका आदींनी मुख्यमंत्री महाराष्ट्र, यांना जिल्हाधिकारी बीड याचा मार्फत निवेदन देण्यात आले.




राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४



# पाटोद्यात जलजीवन मिशन प्रशिक्षणाचा बोजवारा

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायत मध्ये जलजिवन योजना राबविण्यात येत असून जल महत्त्व पटवून देण्यासाठी. राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्ष महाराष्ट्र शासन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन जलसाक्षरता दोन दिवशी अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम सध्या दि.११ व १२ रोजी पाटोद्यात चालू असून मात्र या प्रशिक्षणाला प्रत्येक ग्रामपंचायत मधून पाच जण येणे आवश्यक असून मात्र याठिकाणी बहुतांश कर्मचारी . सरपंच.सदस्य सह आदी हे दि.११ रोजी आले नसुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला असून संबंधित पाटोदा पंचायत समिती स्वच्छता अभियानाचे कर्मचारी हेच बोगस सह्या करून गैरहजर असले लेही हजर दाखवून जेवण केले दाखवले जात आहे. जे काही प्रशिक्षणाला आले होते ते बाहेर फिरत होते फक्त. नोंद हे दाखवत असुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला आहे तरी याकडे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ या प्रशिक्षण ची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.**






## मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी

याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र शासन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन जलसाक्षरता दोन दिवशी अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम सध्या दि.११ व १२ रोजी पाटोद्यात चालू असून या प्रशिक्षणाला ग्रामपंचायत अधिकारी. जलसुरक्षक .सरपंच. उपसरपंच .सदस्य.पाणीपुरवठा व स्वच्छता समितीअध्यक्ष.सचिव.महिला.सदस्य. ग्राम संघाच्या दोन महिला.जलसाक्षरता विषयक अनिवासी दोन प्रशिक्षण ५९ ग्रामपंचायत मधील पाच जण बोलवले आहेत. मात्र ११ रोजी आले नसुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला असून संबंधित पाटोदा पंचायत समिती स्वच्छता अभियानाचे कर्मचारी हेच बोगस सह्या करून गैरहजर असले तरी हजर दाखवून जेवण केले दाखवले जात आहे. जे काही प्रशिक्षणाला आले होते ते बाहेर फिरत होते बोगस फक्त नोंद हे दाखवत असुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला आहे तरी याकडे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ या प्रशिक्षण ची चौकशी करावी व पाटोदा पंचायत समितीच्या स्वच्छता विभागाची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

तालुक्यात जलजीवन योजनेच्या अनेक योजना बोगस असून अनेक गावांमध्ये तर टाकी आहे त काही ठिकाणी नळ योजना नाही या सर्व बाबीची बहुतांशी सरपंच आम्हाला माहीतच नाही तरी याची चौकशी करून या प्रशिक्षणाची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी एका सरपंचांनी केली आहे.

# अंबड तहसील कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन

अंबड । प्रतिनिधी

अंबड येथील तहसील कार्यालयात सोमवार १६ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अंबड तहसील कार्यालया मार्फत जिल्हा संघटक अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे डॉ. रमेश तारगे यांना कळविण्यात आले आहे.




अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या निवेदनानुसार चालू डिसेंबर महिन्यापासून प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तहसीलदार विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील पोलिस निरीक्षक, गटविकास अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी, सर्व बँकेचे व्यवस्थापक, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी, विद्युत महामंडळाचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम, लघु पाटबंधारे, जलसंधारण, मृदू व संधारण या उपविभागाचे उपविभागीय अभियंता, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंतासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी १६ डिसेंबर रोजी सोमवारी कोणतेही कारण न सांगता बैठकीला हजर राहावे असे संबंधित विभागांना अंबड तहसील कार्यालय अंतर्गत कळविण्यात आले आहे.

पासून महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत शहरासह तालुक्यातील नागरिक, महिला व शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे अडीअडचणीचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक, महिला व शेतकरी बांधवांनी या तालुकास्तरीय लोकशाही दिनानिमित्त आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात. यापुढेही १६ डिसेंबरपासून तालुकास्तरीय लोकशाही दिनाच्या बैठका दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी सुरूच राहणार असल्याचे पत्राद्वारे म्हटले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सुर्यपुत्रास जयंती दिनी अभिवादन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव यांच्या विद्यमाने सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन के कॅम्प येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र,चैत्यभूमीचे शिल्पकार , बौद्धाचार्यांचे जनक सुर्यपुत्र भैय्यासाहेब ऊर्फ यशवंत भिमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे वंचित बहुजन आघाडीचे नेते अंकुश जाधव , केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे यानी आपले विचार माडले तर या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे नेते भारत तांगडे,धम्मानंद साळवे, भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान ,शेलापुरी चे उपसरपंच नाथाजी घडसे,हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मायाताई स्वामी यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरे यांनीमानले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे संरक्षण सचिव दयानंद साळवे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन डोंगरे,मोहन



काकडे,भानुदास साळवे,राजेभाऊ साळवे, भगवान डोंगरे,डी पी वाघमारे नाना,संभाजी धाईजे, बाबासाहेब घनघाव,मंदाताई साळवे,विशाखाताई वाघमारे,पोहरेताई, वैशालीताई गायकवाड,घनघावताई यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## श्री क्षेत्र मलकापूर येथे दत्तजयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन


गेवराई । प्रतिनिधी

श्री क्षेत्र मलकापूर येथे दत्तजयंती निमित्त जनसेवानंद वै.गु.सदगुरु सुभाष बप्पा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प. एकनाथ महाराज यांच्या नेतृत्वाखाली दि.८ ते १४ डिसेंबर दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व सिद्ध सुभाषबप्पा महाराज ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तर आज दि.१४ डिसेंबर रोजी ह.भ.प. वैजनाथ महाराज उस्तुरे औसेकर यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने या भव्य सोहळ्याची सांगता होणार आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थान मलकापूर संस्थांचे मठाधिपती श्रीगुरु एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

श्रीक्षेत्र मलकापूर येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी श्री दत्त जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह श्री दत्त जन्मोत्सव साजरा केला जात आहे. या ठिकाणी दि.८ ते १४ डिसेंबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांनी हजेरी लावून आपली सेवा दिली. तसेच वै.सुभाष बप्पा महाराज यांच्या ग्रंथाचे पारायण झाले.

### ह.भ.प.वैजनाथ महाराज उस्तुरे यांचे आज काल्याचे कीर्तन

तर या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प.वैजनाथ महाराज उस्तुरे गुरुजी यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने सांगता



होणार आहे. तरी सांगता सोहळ्यास भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थान मलकापूर चे मठाधिपती ह.भ.प. एकनाथ महाराज लोमटे तालुका कळंब जिल्हा धाराशिव यांनी केले आहे.

## वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घेण्यासाठी आज वडवणी बंद



वडवणी । प्रतिनिधी

जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावर राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत यासाठी वडवणी तहसीलदारांना दिले निवेदन.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,बीड जिल्ह्यात वाढत्या लोकप्रियतेमुळे जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावरील जातीय राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा खोट्या गुन्ह्याच्या निषेधार्थ उद्या शनिवार दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी बंद ची हाक देण्यात आली आहे.या निषेध रॅली ची सुरुवात चाटे चौक वडवणी येथून सकाळी १०:०० वाजता सुरू होईल ते ११:३० वाजता वडवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रॅली समाप्त होईल. यावेळी वडवणी नगरपंचायतचे माजी नगरसेवक सतीश बप्पा बडे तसेच युवा नेते संजय भाऊ आंधळे,भास्कर मुंडे,गोरख पवार,रमेश काका मुंडे,उत्तरेश्वर कागणे आदींनी वडवणी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत ट्रेनी शिक्षक ( शिकाऊ) यांचे गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने अंतर्गत कार्यरत (ट्रेनर शिक्षक) हे शासन निर्णयाच्या आधिन राहून, शासन निर्णयाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र व पुर्ण वेळ नियुक्त शाळेवर कार्यरत असून, शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने सहा महिन्याचे प्रशिक्षण हे अपुर्ण व अर्धवट होईल. करिता किमान शैक्षणिक वर्ष पुर्ण करण्याची बाब विचाराधीन ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व ट्रेनी (शिकाऊ) शिक्षक यांचे प्रशिक्षण किमान पुर्ण होण्याच्या अनुषंगाने विचार करून आपण ट्रेनी शिक्षक यांना सदरील नियुक्ती शाळेवर किमान एक वर्ष (१२ महिने) प्रशिक्षण मिळावे या मागणीसाठी दि .१२ दिसेबर रोजी माजलगाव गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांना निवेदन देण्यात आले.




सदरील विषयाचा गांभिर्यपुर्वक विचार करून ट्रेनी शिक्षक यांना नियुक्ती शाळेवर शैक्षणिक वर्षाच्या अनुषंगाने किमान एक वर्ष (१२ महिने ) एवढा कार्यकाळ वाढवून देण्यात यावा . सदरील विषयावर लक्ष केंद्रीत करून न्यायाची भुमिका घेत किमान एक वर्ष कार्यकाळ वाढवून देण्यात यावा व जलद गतीने कार्यवाही करण्यात यावी हि मागणी या वेळी उपस्थित युवा प्रशिक्षणार्थी (ट्रेनिंग शिक्षक) यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी झालेल्या छोट्या खाणी झालेल्या बैठकीत गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी व श्री. पोटभरे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. व आपल्या मागण्या शासन दरबारी मांडून आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही पण प्रयत्नशील आहोत याची ग्वाही दिली.

यावेळी दळवी गोविंद , घडसिंगे अनंत , हिवाळे मुकुंद , राठोड विशाल ,पवार शरद, थोरात भिम , टाकणखार सुमित,पट्टेकर अनिकेत, भालेकर आकाश, खुने प्रशांत, सय्यद नईम, जाधव निलेश यांच्यासह महिलांची उपस्थिती ही लक्षणीय होती. यावेळी कांबळे शिल्पा ,उघडे सिमा, सावंत पुजा, वाघमारे अर्चना,शिंदे पुजा, जाधव कोमल, ऊखंडे अमृता, टाकणखार किर्ती, शिंदे विद्या, होके अन्विता, यांच्यासह अनेक युवा प्रशिक्षणार्थी ( ट्रेनी शिक्षक) उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना भीमराव आप्पा टाकणखर,काँग्रेसचे नेते दत्ताभाऊ कांबळे, पत्रकार मच्छिंद्र उफाडे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.


**प्रसिद्धी पत्रक**
**नगर पंचायत कार्यालय, पाटोदा**
ता.पाटोदा जि.बीड

जा.क्र.६९१ दि.१३/१२/२०२४

अर्जदारचे नाव : आसाराम निवृत्ती तांबे यांना कै.यमुनाबाई निवृत्ती तांबे यांच्याकडून वारस हक्काने खालील चतु:सिमेच्या आतील

घर नंबर–२२४८ खुला प्लॉट नं.– वार्ड क्र.– विभाग– भाग नं.१ साईज ४४X२४, भाग – २

चतु:सिमा
पूर्व– पूर्व–
पश्चिम–पश्चिम–
दक्षिण– दक्षिण–
उत्तर– उत्तर–
लांबी रुंदी–

खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.दि.२८–११–२०२४ आहे. कोर्ट वारस प्रमाणपत्र अर्जदाराने नोंदणी करून नोंदणीची नक्कल मागितली आहे. करीता उजर असल्यास हे प्रसिद्धीपत्रक झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत पुराव्यासहीत असल्यास या कार्यालयात दाखल करावे नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नक्कल दिली जाईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/–
नगर पंचायत कार्यालय, पाटोदा


## सर्व जाती धर्माच्या गोरगरीब लोकांना सोबत घेऊन चालणाऱ्या आ.सोळंकेंना मंत्रिपदाची संधी द्या–पठाण

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा,शिवसेना राष्ट्रवादी अजित पवार महायुतीला मोठ्या प्रमाणावर मतदारांकडून प्रतिसाद मिळाला आणि राज्यात सरकार स्थापन झाले यात मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार व एकनाथ शिंदे यांची वर्णी लागली आता मंत्रीमंडळ स्थापणाच्या हालचालीला वेग आला आहे

यात प्रामुख्याने महायुतीमधील अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला मराठवाड्यात घवघवीत यश मिळाले असल्याने आता मंत्र्यांचा शपथविधी सोहळा काही दिवसांवर येवून ठेपला असतांना बीड जिल्ह्यातून माजलगाव विधानसभा




मतदारसंघात विजयी चमत्कार करणारे माजी मंत्री आमदार प्रकाश सोळंके यांनी विजय मिळवला आणि मंत्रिपदाची दावेदारी पक्की केली असल्याचे बोलले जात आहे. नवीन मंत्रीमंडळात आ.प्रकाश सोळंके यांचा समावेश करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते फेरोज पठाण यांनी जयसिंग भैय्या सोळंके मंचाच्या वतीने वरिष्ठ नेत्यांकडे केली आहे.

मतदारसंघाच्या विकासासाठी अनेक वर्षापासून सतत अभ्यासपूर्ण प्रयत्न करणारे आमदार प्रकाश सोळंके यांनी मतदार संघात शासनाच्या विविध योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून यांचा लाभ गोर गरीब जनतेला मिळवून दिला आहे यासोबत गाव गाड्यासह तांडा वस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर विकास केला असल्याचेही यावेळी श्री फेरोज पठाण यांनी सांगितले.आमदार प्रकाश सोळंके यांना मंत्री पदाचा मान दिल्यास भविष्याच्या काळात मराठवाड्यात पक्षाला मोठी ताकत मिळणार असून सोबत मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून निघण्यास ही मदत होईल यात तिळमात्र शंका नसल्याचेही यावेळी श्री पठाण यांनी सांगितले.

## सर्वज्ञ दासोपंतांनी स्वयंप्रेरणेने पंचीकरणाच्या तत्वासंबंधी मांडणी केली –संजय देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पंचीकरण पासोडी हा ग्रंथ मराठी संतवाङ्मयात अनन्य,अपूर्व व एकमेवाद्वितीय असाच ग्रंथ म्हणावा लागेल.प्राचीन काळी पांघरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जाड्या–भरड्या कापडास पासोडी म्हणतात अशा कापडावर खळीचे लेप देऊन सुकविले जायचे दणकट राहण्यासाठी विशीष्ट पावडरचा उपयोग करून आणि कवडय़ांच्या साहाय्याने घासून हा कपडा गुळगुळीत केला जातो. या प्रक्रियेतून पासोडी टिकाऊ व मजबूत बनवली जाते.



अशा पासोडीवर वेदान्ताचे आकृतीसह स्पष्टीकरण देताना, कपाटाकृती विवरणात्मक मांडणी करून पिढ्यान् ?पिढ्या हा अमूल्य विषय अमीट राहावा या उद्देशाने सर्वज्ञ दासोपंतांनी चित्राकृतीतून अध्यात्मासारखा विषय सर्वांसाठी प्रतिपादन करणे गरजेचे आहे हे ओळखुन सर्वज्ञ दासोपंतांनी पंचीकरण पासोडी ग्रंथांचे लेखन केले मत अंबड येथील ख्यातनाम प्रवचनकार संजय देशमुख यांनी व्यक्त केले.

ते दत्त जयंती नवरात्र महोत्सवाच्या निमित्याने दत्त संस्थान थोरले देवघर येथे दत्तजयंती नवरात्र महोत्सवा निमित्याने आयोजित प्रवचनात बोलत होते. पुढे त्यांनी सांगितले की, कापडावरील लेखन प्रकार म्हणजे जगातील आठवे आश्चर्य असून पासोडी मधील चित्रांच भाग वगळता इतर भागात स्वयंप्रेरणेने पंचीकरणाच्या तत्वासंबंधी चिकित्सात्मक मांडणी केली असून वेदांताचे आकृतीसह स्पष्टीकरणाची माहिती देण्यात आली असून हा अमुल्य विषय सदैव चिंतनात्मक तयार रहावा हीच त्यांची धारणा होती. त्यातील वेदांतामुळेच महत्व वाढले असल्याचे ते म्हणाले.

दत्तसंस्थान थोरले देवघर इथे प्राचीन काळापासून सर्वज्ञ दासोपंत संस्थापित प्रभु दत्तात्रेयाची उपासना दत्तजयंती नवरात्र महोत्सवा निमित्ताने सुरू असून मान्यवरांचे भजन,किर्तन,प्रवचन, गायन,अभिषेक, पालखी सोहळा आदींचे आयोजन करण्यात आले असून भक्तांचा उत्साह वाढताना दिसत आहे.


**जाहीर प्रकरण**

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १७५२/२०२४**
**सोना हरिभाउ चव्हाण व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार १ सोना पि. हरिभाऊ चव्हाण, वय ७६ वर्षे, धंदा शेती, २.बाबा पि सोनाजी चव्हाण, वय ३६ वर्षे धंदा शेती, दोघे रा. सोनगाव, ता. जि. बीड

३. सविता भ्र. सदाशिव मराठे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. रोहीतळ, ता. गेवराई, जि. बीड ४ अलका महादेव ढोले, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम. रा. भवरवाडी, पो.मिडसांगवी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ५.कविता भ्र. अशोक धुमाळ, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा पौळाचीवाडी, पो. खळेगाव, ता गेवराई, जि. बीड ६.सुनिता बापुराव साबळे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा कुळूकवाडी, पो. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड ७ जनाबाई भ्र. नारायण काशीद, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा.आमला,पो.वाहेगाव आमला, ता. गेवराई, जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मुक्ताबाई भ्र. सोनाजी चव्हाण, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत मुक्ताबाई भ्र. सोनाजी चव्हाण, यांचा मृत्यु दिनांक २७/०४/२०२२ रोजी झाला आहे यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत मुक्ताबाई भ्र.सोनाजी चव्हाण, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मुक्ताबाई भ्र. सोनाजी चव्हाण, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७/०१/२०२५ आहे.

स्वाक्षरित/– आदेशावरून
क.लिपीक स्वाक्षरित/–
दिवाणी न्यायालय व स्तर, बीड.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४
४

# कापूस उत्पादन वाढीसाठी १७५ एकरांवर विशेष प्रकल्प

## संभाजीनगर जिल्ह्यात राबविला उपक्रम

संभाजीनगर : केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर व गांधीली स्थित एमजीएम कृषी विज्ञान केंद्राच्या पुढाकारातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाच तालुक्यात १७५ एकरांवर कापूस उत्पादन वाढीसाठीचा विशेष प्रकल्प राबविला गेला. तीन तंत्रज्ञानाचा संगम घडवून राबविल्या गेलेल्या या प्रकल्पाचे फलित कापसाच्या राहिलेल्या वेचणीनंतर स्पष्ट होणार आहे.

कृषी विज्ञान केंद्राच्या माहितीनुसार, कापसाची उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या मार्गदर्शन व समन्वयातून एमजीएम कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, पैठण या पाच तालुक्यांतील ३१ गावांतील ८९ शेतकऱ्यांच्या १७५ एकरांवर कापूस उत्पादन वाढीसाठी विशेष प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पात गंगापूर तालुक्यातील १० गावांतील ३०, वैजापूर तालुक्यातील ७ गावांतील २५, कन्नड तालुक्यातील ११ गावांतील २७, खुलताबाद तालुक्यातील २ गावांतील ६, तर पैठण



तालुक्यातील एका गावातील एक शेतकरी सहभागी झाला होता. या विशेष प्रकल्प अंतर्गत कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने प्रत्येक प्रक्षेत्रावर आतापर्यंत चार प्रक्षेत्र भेटी घेण्यात आले. चार शेतीदिन कार्यक्रम व आजवर सहा पीक कापणे प्रयोग घेण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर प्रकल्पांतर्गत प्रात्यक्षिक प्लॉटही घेण्यात आला. विशेष कापूस प्रकल्प अंतर्गत एमजीएम कृषी विज्ञान केंद्र गांधेली येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या उत्तम कापूस व्यवस्थापन एकदिवसीय कार्यशाळेच्या वेळी शेतकऱ्यांनी या प्लॉटला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणीही केली.

### प्रकल्पात वापरले तीन तंत्रज्ञान

कापूस उत्पादन वाढीसाठीच्या विशेष प्रकल्पात शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर घन पद्धतीने कापूस लागवड, सघन कापूस लागवड आणि दादा लाड तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. घनपद्धतीने कापूस लागवडीत कपाशीतील अंतर ३ बाय १ फूट तसेच सघन कापूस लागवड पद्धतीत कपाशीचे अंतर ३ फूट बाय ९ इंच सोबत वाढरोधकाचा वापर करण्यात आला. घनपद्धतीने कपाशी लागवड ९ एकरांवर, तर सघन पद्धतीने कापूस लागवड तब्बल १४५ एकरांवर करण्यात आली.

# राज्यातील द्राक्ष बागा संकटात

## पाच वर्षात ५० हजार एकरांवरील बागा नष्ट



नाशिक : द्राक्ष पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकसह राज्यभरातील द्राक्ष बागांच्या संख्येत घट होत आहे. नोटबंदीपासून विविध कारणांनी द्राक्ष बागांना फटका बसण्यास सुरुवात झाली. उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत जातोय, त्या तुलनेत उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे अस्मानी-सुलतानी संकटाचा सामना करताकरता खचलेल्या असंख्य शेतकऱ्यांनी द्राक्ष बागांवर कुऱ्हाड चालविण्यास सुरुवात केली आहे. मागील पाच वर्षात साधारणतः ५० हजार क्षेत्रावरील द्राक्षबागा नष्ट झाल्या आहेत.

राज्यात चार ते साडेचार लाख एकरावर द्राक्षबागा आहेत. त्यातून जवळपास तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. मात्र निर्यात धोरण, सारख्या कराची आकारणी, मजुरांचा तुटवडा, व्यापाऱ्यांकडून होणारी शेतकऱ्यांची फसवणूक, हमीभाव नसणे, अवकाळी पाऊस, गारपीट अशा एका पाठोपाठ एक येणाऱ्या संकटाच्या मालिकांमुळे युरोप, बांगलादेश, रशियासह जगाच्या वेगवेगळ्या भागात गोडवा पोचविणाऱ्या द्राक्ष बागाच्या संख्येत घट होत आहे. नाशिकसह सांगली, सोलापूर, बारामती, इंदापूर, पुणे या भागातील द्राक्षबागा उद्ध्वस्त व्हायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे सरकारने वेळीच लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

शेतकऱ्यांच्या द्राक्षबागा उजाड : नाशिकची ओळखच मंदिरांची नगरी आणि जिभेला गोडवा देण्याऱ्या द्राक्षांमुळे झाली आहे. याच द्राक्षांमुळे देशाची वाईन कॅपिटल होण्याचा बहुमानही नाशिकच्याच नावावर आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांमुळे नाशिकची ओळख निर्माण झाली आज त्याच शेतकऱ्यांच्या द्राक्षबागा उजाड झाल्याचे चित्र आहे. ज्या बागेत डिसेंबर महिन्यात रसरशीत द्राक्ष घडाला लागण्यास सुरवात होत होती. औषध फवारणी करत बागांची निगा राखली जात होती, आज त्याच बागेत काँग्रेस गवत वाढलेले दिसत आहे. ज्या अँगल आणि तारांवर हिरवेगार द्राक्षाचे वेल हवेची झुळूक येताच डोलायचे, त्याच तारांवर आज गंज चढला असून भंगाराच्या भावात विक्री होण्याची वाट बघत आहेत.

# शेळ्यांचे जंत निर्मुलन व आरोग्य व्यवस्थापन



शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो.

शेळयांच्या जंतनिर्मुलनासाठी जंतनाशकाचा वापर :

शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात. जानेवारी व जुलै : अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे. एप्रिल व ऑक्टोबर : डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे.


लाळ्याखुरकत :हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते. उपचार व प्रतिबंध - या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे. (१ मि.ली.)

वरीलप्रमाणे शेळ्यांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना शेळीपालन एक किफायतशीर व्यवसाय फायद्याचा ठरेल व शेळीपालकांचा आर्थिक स्तर उंचावेल.

# तणनाशक फवारताना अशी घ्या काळजी

सध्या रब्बी हंगामातील पेरण्या शेवटच्या टप्प्यात आहेत. ज्या पिकांची पेरणी किंवा लागवड होऊन महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे, अशा शेतात सध्या आंतर मशागतीचे काम सुरू असतील. यापैकी तणनियंत्रण किंवा तणनाशक फवारणी हे महत्त्वाचे कार्य आहे. अनेकजण चुकीच्या पद्धतीने तणनाशकाची फवारणी करत असल्याने त्याचा फायदा होण्यापेक्षा नुकसानच होताना दिसत आहे. तणनाशक फवारणीसाठी करण्यासाठी काही बाबी लक्षात ठेवायच्या असतात. त्या बाबी कोणत्या ही महिती करून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात शेतात निंदण कामासाठी मजूरांचा फार मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. पूर्वीसारखे शेतमजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी तणनाशक फवारणीकडे वळले आहेत. यामुळे कमी वेळात आणि कमी खर्चात तणनियंत्रण होते.

वेगवेगळ्या पिकातील तण आणि उपयुक्त तणनाशके : सूचीपर्णी पिकांसाठी: गहू, भात, ऊस, ज्वारी, आदी पिकांमध्ये २-४ डी हे हार्मोनवर्धक तणनाशक फवारले जाते. चपट्या पानांच्या पिकांसाठी: कापूस पिकांतील तणनाशक फवारण्यासाठी पेंडीमेथैलिन याची फवारणी केली जाते. सर्व प्रकारच्या तणांच्या समूळ उच्चाटनासाठी: सर्व प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी जेव्हा पीक उभे नसेल तेव्हाच राउंडअप फवारणी केली जाते.तणनाशक फवारणीसाठी महत्त्वाच्या बाबी : जमिनीत ओलावा असताना तणनाशकाची फवारणी केल्यास ते अधिक फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला व थोडीशी उघडीप मिळताच शेतकर्यांनी तणनाशक फवारणी करावी. काही शेतकरी कोरड्यावरच फवारणी करीत आहेत; अशा कोरड्या जमिनीत तणनाशक फवारणी टाळावी. तण कोवळे असताना तणनाशक फवारल्यास ते त्यावर मारक ठरते. कोवळे तण लवकर मरते. शक्यतो जमिनीत ओलावा असतानाच तणनाशकांची फवारणी करावी, तणनाशक फवारणीनंतर जमिनीला पाणी देऊ नये अन्यथा तणनाशकाचा पाहिजे तेवढा परिणाम होणार नाही. तणनाशक फवारणी केलेली टाकी तसेच फवारणी पंप लगेच दुसर्या पिकांवर फवारणीसाठी उपयोगात आणू नये. तो पंप स्वच्छ, गरम पाण्याने साफ करूनच त्याचा वापर करावा. बाजारात अनेक प्रकारची तणनाशके उपलब्ध आहेत. पिकांमध्ये कोणत्या प्रकारचे तण अधिक आहे, त्यानुसार तणनाशक खरेदी करावे. चुकीचे तणनाशक फवारणी केल्यास पिकांना याचा फटका बसतो. जमिनीची गुणवत्ता आणि प्रकार बघूनच तणनाशक फवारणी करावे. अनेकदा हलक्या जमिनीत घातक तणनाशक फवारणी केल्यास याचा पिकांच्या उत्पादनासह जमिनीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. तणनाशक फवारणी करताना जमिनीत ओलावा असावा, वातावरण चांगले असावे, स्वच्छ पाणी, स्वच्छ पंप, कीटकनाशकापासून तणनाशक दूर ठेवणे, आदी काळजी घ्यावी लागते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९६२ : नासाचे मरिनर २ (चित्रीत), जगातले पहिले अवकाशयान झाले जे शुक्र ग्रहाच्या जवळुन यशस्वी रीत्या उडाले.
१९६१ : टांझानियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९४१ : दुसरे महायुद्ध - जपानने थायलँडबरोबर सहकार्याचा करार केला.
१९२९ : 'प्रभात'चा 'गोपालकृष्ण' हा चित्रपट मुंबईच्या 'मॅजेस्टिक' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९०३ : किटीहॉक, नॉर्थ कॅरोलिना येथे राईट बंधूंनी उड्डाणाचा पहिला प्रयत्न केला.
१८१९ : अलाबामा हे अमेरिकेचे २२ वे राज्य बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९५३ : विजय अमृतराज - भारतीय लॉनटेनिसपटू
१९४६ : संजय गांधी - राजकारणी व इंदिरा गांधी यांचे पुत्र (मृत्यू: २३ जून १९८०)
१९३९ : सतीश दुभाषी - चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते (मृत्यू: १२ सप्टेंबर १९८०)
१९३४ : श्याम बेनेगल - चित्रपट दिग्दर्शक व पटक थालेखक
१९२८ : प्रसाद सावकार - गायक व नट
१९२४ : राज कपूर - अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आणि 'द ग्रेटेस्ट शो मॅन' (मृत्यू: २ जून १९८८)
१९१८ : योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार - जागतिक कीर्तीचे थोर तत्त्ववेत्ते जे. कृष्णमूर्ती यांना त्यांनी योगविद्येचे पाठ दिले.हा त्यांचा ग्रंथ जगात 'योगविद्येचे बायबल' समजला जातो.
१८९५ : जॉर्ज (सहावा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९५२)
१५४६ : टायको ब्राहे डच खगोलशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रावर मूलभूत संशोधन केले. (म्रुत्यू: २४ आक्टोबर १६०१)
१५०३ : नोट्रे डॅम - प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी, गणितज्ञ व भविष्यवेत्ता (म्रुत्यू: २ जुलै १५६६)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९७७ : गजानन दिगंबर तथा ग. दि. माडगूळकर - गीतकार, कवी, लेखक, पटकथाकार, अभिनेते. गीतरामायणामुळे त्यांना 'महाराष्ट्राचे वाल्मिकी' म्हणून ओळखले जाते. (जन्म: १ आक्टोबर १९१९)
१९६६ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' - गीतकार (जन्म: १९२३)
१७९९ : जॉर्ज वॉशिंग्टन - अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७३२).

# कोकण सोडून इतर भागांतील आंबा पिकासाठी विमा योजना

आंबा पिकासाठी विमा योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेऊ शकतात. गारपीट या हवामान धोक्यापासून आंबिया बहरामधील फळपिकांना विमा संरक्षण दिले जाते. त्यासाठी नियमित विमा व्यतिरिक्त वेगळा विमा हप्ता बँकेत भरावा लागतो.

विमा योजना कोकण सोडून इतर भागांतील आंबा पिकासाठी अहिल्यानगर,लातूर, धाराशिव,परभणी, नांदेड, वाशीम, जालना, सोलापूर, धुळे, जळगाव, नंदुरबार, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर, बीड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा या अधिसूचित जिल्हा, तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळात लागू आहे. या जिल्ह्यात शासनामार्फत अधिसूचित महसूल मंडळ पातळीवर असलेल्या शासकीय हवामान केंद्र आकडेवारीवरून नुकसान भरपाई अंतिम केली जाते. या योजनेअंतर्गत आंबा पाच वर्ष वय झालेल्या पिकास निवडलेल्या विमा कंपनी मार्फत खाली नमूद केलेल्या विमा संरक्षण कालावधीत निवडक हवामान धोक्यामुळे होणाऱ्या संभाव्य पीक नुकसानीस (आर्थिक) पुढील प्रमाणे विमा संरक्षण प्रदान होईल.

शेतकऱ्यांचा योजनेतील सहभाग :

योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेवू शकतात. पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदारांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक राहणार



आहे. बिगर कर्जदार शेतकरी विहित मुदतीत बँकेत विमा हप्ता जमा करून सहभाग घेऊ शकतात. त्यासाठी आधार कार्ड, जमीन धारणा ७ /१२ , ८(अ) उतारा व पीक लागवड स्वयंघोषणा पत्र, फळबागेचा जिओ टॅगिंग केलेला फोटो, बँक पासबुकवरील बँक खात्याबाबत सविस्तर माहिती लागेल. कॉमन सर्व्हिस सेंटर मार्फत अर्ज ऑनलाइन भरता येतील. एक शेतकरी त्याच्याकडे एकापेक्षा अधिक फळपिके असल्यास योजना लागू असलेल्या पिकांसाठी तो विमा योजनेत सहभाग घेऊ शकतो, मात्र त्या फळपिकासाठी ते महसूल मंडळ अधिसूचित असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी फळपीक लागवड केलेली नसताना किंवा उत्पादन योग्य फळपीक नसताना, दुसऱ्याच्या जमिनीवर किंवा शासनाच्या जमिनीवर, अकृषक जमिनीवर विमा काढून विमा योजनेत सहभाग घेतल्यास त्यांचे विरुद्ध कडक कारवाई होऊ शकते. यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे उत्पादन योग्य वयाची फळबाग आहे, त्यांनी योजनेत सहभाग घ्यावा. शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीवर फक्त विमा घ्यावा. शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता हा सर्वसाधारणपणे विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्क्यांच्या मर्यादेत असतो. मात्र एकूण वास्तवदर्शी विमा हप्ता ३५ टक्क्यांहून अधिक असल्यास त्या अधिक विमा हप्त्यातील ५० टक्के भार शेतकऱ्यांना उचलावा लागतो. विमा हप्ता दर जिल्हा निहाय वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे शेतकऱ्याने भरवायच्या विमा हप्त्यात जिल्हानिहाय फरक असू शकतो. गारपीट या हवामान धोक्यापासून आंबिया बहरामधील फळपिकांना विमा संरक्षण दिले जाते. त्यासाठी वरील नियमित विमा व्यतिरिक्त वेगळा विमा हप्ता बँकेत भरावा लागतो. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरिता एका फळपिकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हेक्टर) आणि उर्वरित विभागासाठी कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हेक्टर) अशी मर्यादा राहील. जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रती शेतकरी ४ हेक्टर मर्यादेपर्यंत राहील. सदर फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी ई - पीक पाहणी करणे अनिवार्य आहे. विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे. भाडे पट्टीने शेती करत असल्यास भाडे करार नोंदणीकृत असावा.

शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन हप्ता भरण्यासाठी विमा पोर्टल ु.षिलू.र्सीं.ळप या विमा योजनेअंतर्गत हवामान धोक्याच्या ट्रिगर कार्यान्वित झाल्यास त्या महसुल मंडळातील त्या पिकासाठी भाग घेतलेल्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीकडून देण्यात येणार आहे.

# आंबेडकरी वस्त्यातील कोंबिंग ऑपरेशन थांबवा







## परभणी घटनेच्या संदर्भात रिपाइंचे आंदोलन

बीड। प्रतिनिधी

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे एका माथेफीरुने संविधान प्रतीचा अवमान केला आहे. त्यामुळे संबंध देशवासीयांच्या भावना दुखावल्या आहेत. तसेच मसाजोग येथील सरपंच देशमुख यांच्या हत्येतील आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ बीड रिपाइं मध्यवर्ती कार्यालयापासून बीड जिल्हाधिकारी पर्यंत जाऊन निदर्शने करण्यात येऊन त्यांना शुक्रवार (ता.१३) रोजी निवेदन सादर करण्यात आले. सदरील आंदोलन रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मंत्री रामदास आठवले, युवा रिपाई प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली, रिपाइं सरचिटणीस राजू जोगदंड यांच्या उपस्थितीत व रिपाईचे धडाडीचे क्रियाशील तालुका अध्यक्ष किशन तांगडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारतीय संविधान प्रतीचा अवमान करणाऱ्या माथेफिरु आरोपीला कठोर शिक्षा करण्यात यावी, तसेच परभणी पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोंबिंग ऑपरेशन सुरू आहे ते कोंबिंग ऑपरेशन तात्काळ थांबविण्यात यावे. देशाच्या सर्वोच्च स्थानी भारतीय संविधान आहे. या संविधानाचा कोणी अवमान करत असेल तर त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारची गय केली जाऊ नये. भारतीय संविधान देशातल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण देण्याचे काम करते. जर कोणी त्याचा अवमान करत असेल तर प्रशासनाने देखील ही बाब गंभीरतेने घेणे गरजेचे आहे. भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या माथेफिरुच्या विरोधात कठोर कारवाई व्हावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी मायाताई मिसळे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, प्रभाकर चांदणे,नवनाथ डोळस, भैय्यासाहेब मस्के, भीमराव घोडेराव,राहुल कांबळे,रामेश्वर खळगे,देवानंद वाघमारे,मंगेश पवार, राजेभाऊ वक्ते, महेंद्र वडमारे, भैय्यासाहेब वाघमारे, सुरेखा डोंगरदिवे, विशाल इंगोले, धम्मा पारवेकर, आनंद मोरे, विशाल वक्ते, देवानंद वाघमारे, समाधान गवळी, अनिता तुरुकमारे, संभाजी गायकवाड,प्रविण निसर्गंध, मनोज बोराडे, मंगेश पवार, विकाश ओव्हाळ, रमेश जावळे, अविनाश गायकवाड, राहुल गायकवाड, सुवर्णा मिसळे, शोभा गलांडे, रमेश जावळे, यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

## महावितरण कंपनीकडून अनियमित विद्युत पुरवठा

### कारंजा टॉवर ते बलभीम चौक भागात नागरिक झाले त्रस्त

बीड। प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टावर ते बलभीम चौक या मोठ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून महावितरण कंपनीकडून अनियमित विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याने दिवसातून दहा वेळेस या परिसरात लाईट बंद होत आहे. एकदा गेली की लवकर येत सुद्धा नाही. यामुळे या भागातील व्यापाऱ्यांसह नागरिकही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. अशी माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.






याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, महावितरण कंपनीकडून दिवसेंदिवस वाढविण्यात येत असलेले वीज युनिट चे बील दरमहा भरून सुद्धा महावितरण कंपनी शहरातील अनेक भागात सुरळीत विद्युत पुरवठा करण्यास आजही पूर्णपणे सक्षम नसल्याचे दिसून येत आहे. दोन-तीन महिने जर वीज बिल थकीत राहिले तर महावितरण कंपनीचे अभियंता आणि कर्मचारी मोठा लावाजमा घेऊन थकीत बिल राहिलेल्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा कापून टाकतात. एवढी तत्परता मात्र महावितरण कंपनी विद्युत पुरवठा नियमित व सुरळीत ठेवण्यासाठी मात्र दाखवीत नसल्याचा प्रत्यय शहरातील अनेक भागात येतो आहे. असाच अनुभव गजबजलेल्या ऐतिहासिक कारंजा टावर पासून ते बलभीम चौक पर्यंतच्या मोठ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून येत आहे. या भागात दिवस-रात्र दहा वेळेस विद्युत पुरवठा खंडित केला जातो. एकदा लाईट गेली की लवकर येत सुद्धा नाही. यामुळे मोठी बाजारपेठ असलेल्या या भागातील व्यापारी वर्ग आणि येथील रहिवासी नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनीने या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी करू लागले आहेत. विशेष म्हणजे महावितरण कंपनीचे दोन कर्तव्यदक्ष लाईनमन जे कर्तव्यावर असताना शहरातील इतर भागात अत्यंत तत्परतेने आपली सेवा देतात आणि विद्युत पुरवठा सुरळीत ठेवतात ते याच बलभीम चौक भागात राहतात. जिथे राहतात तिथेच विद्युत पुरवठ्याचा अशा प्रकारे ढिसाळ कारभार सुरू असूनही ते का लक्ष देत नाहीत? असा प्रश्नही येथील नागरिक करू लागले असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

## आंबेडकरी समाज जितका शांतताप्रिय तितकाच क्रांतिकारक-प्रदिप उबाळे

पाटोदा। प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी परभणी जिल्ह्यामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधान स्तंभाचे एका व्यक्तीकडून तोडफोड करण्यात आली होती . ही घटना घडल्यानंतर या घटनेचा उद्रेक एवढा प्रचंड झाला की संपूर्ण आंबेडकर समाज रस्त्यावर उतरला होता. आरोपी समाजकंटक काही प्रमाणामध्ये मनोरुग्ण जरी असला तरी त्याला संविधान स्तंभाचे तोडफोड का करू वाटली? याचा मनात संशय व राग आल्यानंतर आंबेडकरी समाजामध्ये प्रचंड असंतोषाची लाट उसळली ,याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उमटले.

राज्यातील ठिकठिकाणी याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला व तहसीलदार उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी यांना विविध सामाजिक संघटना, भीमसैनिक विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते यांनी नवीन निवेदन देऊन आरोपीवर कठोरात कठोर शिक्षा म्हणून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशा प्रकारची मागणी करण्यात आली . आंबेडकर समाज हा जितका तथागत गौतम बुद्धांना व त्यांच्या पंचशील तत्त्वांना मानणारा आहे तितकाच तो अन्यायाविरुद्ध बंड करणारा क्रांतिकारक आहे. ज्या ज्या वेळी देशांमध्ये कोणत्याही जाती धर्माच्या समाजावर अन्याय, अत्याचार होतो त्यावेळेस सर्वात प्रथम रस्तावर उतरून न्याय मिळवण्यासाठी हाच समाज बंड पुकारतो . आंबेडकरी चळवळीतील प्रत्येक भिमसैनिक कोणत्याही तोडफोडीचे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, हिंसा करणे या गोष्टीचे समर्थन करणार नाही परंतु पोलिसांनी कोबिंग ऑपरेशन राबवणे कितपत योग्य आहे? जो समाज शांतपणे आंदोलन करून निषेध व्यक्त करतो त्याला जनरल डायर च्या आदेशाप्रमाणे मारहाण का करता ? विद्यार्थी , युवती यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांचे आयुष्य उध्वस्त का करता?वेळीच आरोपीला अटक केली असती तर कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली असती भलेही तो मनोरूग्ण का असेना त्याला वेळीच अटक का केली नाही? याच्यामागे काही कटकारस्थान तर नसेल ना याची शंका मनात आल्यामुळेच आंबेडकरी समाजाचा प्रचंड उद्रेक झाला असल्याचे एकंदरीत चित्र परभणीत दिसले. राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे अत्यंत महत्त्वाचे असून यामुळे सामाजिक सलोख्यावरती दुरगामी परिणाम होऊन सामाजिक सलोखा व स्वास्थ बिघडते व ते पुन्हा भरून निघायला कित्येक वर्षे लागतात . त्यामुळे सरकारने कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कंबर कसली पाहिजे तरच महाराष्ट्र शांत,सुखाने नांदल नसता महाराष्ट्राचा बिहार होतेय का असं म्हटलं तर चुकीचं ठरवू नये.



## संविधानाची विटंबना करणाऱ्या नराधमावर गुन्हा दाखल करा-साळवे

माजलगाव। प्रतिनिधी

परभणी येथील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर असलेल्या संविधानाची प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या नराधमावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला पाहीजे. सार्वभौम भारत देशाचे संविधान ज्या संविधानावर आधारित संपूर्ण भारत देशभर राज्यकारभार व व्यवस्था चालू आहे त्या संविधानाची विटंबना म्हणजे सार्वभौम भारत देशाची विटंबना करणे होय व भारत देशाची विटंबना करणाऱ्या देशद्रोही व्यक्तीस देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोरात कठोर शासन देण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला असून आरोपीस देशद्रोहाच्या गुन्हाखाली कठोरात कठोर शिक्षा करावी या मागणीचे निवेदन रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली त्या गुन्हेगारास व त्याच्या पाठीमागील मास्टरमाईंड असणाऱ्या व्यक्तींवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या वतीने बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले व राष्ट्रीय नेते डॉक्टर राजरत्न आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल असे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे यांनी निवेदनाद्वारे कळवले आहे प्रसंगी रिपाईचे ॲड नंदकिशोर खळगे, राजकुमार मोरे, वशिष्ठ लांडगे,अंजेराम घनगाव, चंद्रकांत टाकणखार, महेंद्र साळवे, सुरेश साळवे, सय्यद अन्वर भाई, विशाल ससाने, परमेश्वर शिनगारे, संतोष खुणे, धम्मा गावडे, गणेश ढगे, शेख अर्शद, कल्याण शेंडगे, सुमित ओव्हळ, सय्यद नाजेर यांच्यासह शेकडो भीमसैनिक उपस्थित होते.



## महामानव अभिवादन ग्रुपतर्फे माजी सैनिकांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

सेवानिवृत्ती म्हणजे नियत कर्तव्यातून मुक्त होणेच नव्हे तर माजी सैनिकांनी सेवानिवृत्तीनंतर देखील समाज कार्य करून देश सेवा करावी असे प्रतिपादन कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले.भारतीय सैन्य दलातील महार रेजिमेंट ७ व्या बटालियनच्या ६५ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधून सैनिकाच्या अतुलनीय देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरता महामानव अभिवादन ग्रुपने महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे बीड मधील माजी सैनिकांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी एस.टी. महामंडळ बीडचे सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक अरुण वाघमारे हे अध्यक्षपदी तर प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्रशांत वासनिक हे होते.तसेच मानव अभिवादन ग्रुपचे डी.जी वानखेडे,के.एस. वाघमारे, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यु.एस. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जी.एम भोले यांनी केले. सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या करण्यात आले याप्रसंगी सेवानिवृत्त कॅप्टन राजाभाऊ आठवले, पंडितराव चक्रे, कैलास वाघमारे, सर्जेराव चक्रे, संदिपान जाधव यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कॅप्टन राजाभाऊ आठवले सांगितले की सुभेदार रामजी बाबांनी व नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सैन्यांमध्ये महार रेजिमेंट स्थापन करण्याकरता अथक प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नाला साजेल असेच कार्य सैनिकांनी देशसीमेचे रक्षण करून ७ व्या महार बटालियनच्या गोविंद कांबळे यांनी मरणोप्रांत वीर चक्र प्राप्त केले. भारत -चीन, भारत- पाकिस्तान, व कारगिल युद्धातील आणि तसेच काश्मीर व हिमालयातील अत्यंत जीव घेणे प्रसन्न सांगून त्यांनी सर्वांना स्तब्ध केले. याप्रसंगी पंडितराव चक्रे यांनी सैनिकी जीवना बद्दल माहिती दिली व डॉ. बाबासाहेबांच्या शिका संघटित व्हा,संघर्ष करा ह्या मूलमंत्र्याच्या आधारे पुढे गेलेल्यांनी आपण समाजाचे काय देणे लागतो या भावनेतून सेवानिवृत्तीनंतर समाज कार्य करत राहिले पाहिजे हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे असे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. प्रशांत वासनिक सेवानिवृत्त पी.आय.तानाजी शिंगारे, पी.एस.आय.के.डी.भंडारे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमास यशस्वी करण्याकरता बि.डी. तांगडे यांनी बहुमोल परिश्रम घेतले कार्यक्रमास उमाजी आठवले, बि.जी.दळवी अशोक ठोकळ, सोनवणे व शक्य संघ सम्राट अशोका सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.



## प्र.कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांची श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास सदिच्छा भेट

माजलगाव । प्रतिनिधी

दि.१२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांनी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली त्यांचे स्वागत स्थानिक कार्यवाह ॲड विश्वास जोशी व प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे यांनी केले. या भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमाबाबत कौतुक केले आणि महाविद्यालयामध्ये होत असलेल्या सात दिवसीय आरोग्य शिबिरास भेट दिली व महाविद्यालयाच्या एकूण प्रगतीचा आढावा घेऊन महाविद्यालयामध्ये होत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांचा व होत असलेल्या कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**जाहीरनामा**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि.बीड**

**(दंड-विभाग )**

**दूरध्वन्नी - (०२४४१)२८२५४२**

**क्र.२०२४/दंड/जन्म-मृत्यूनोंदणी/कावि-३६०**

E-mail id : tahsildarasthi@gmail.com

**दि.१२/१२/२०२४**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये**

सर्व जनतेस मौजे जामगाव ता. आष्टी. यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. श्रीकांत रोहिदास शिंदे रा. जामगाव ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांची स्वतःची जन्म दि. ०५/०२/१९७४ रोजी मौजे जामगाव ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे स्वतःचे कायदेशीर जन्म चे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
**कार्यकारी दंडधिकारी तथा**
**नायब तहसीलदार आष्टी**

## विद्यार्थ्यांनो शिक्षण आणि शारिरीक कौशल्य जोपासा-परमेश्वर गिराम

### बीड जिल्ह्याला देशसेवेबरोबरच शौर्याची परंपरा- प्रा. धनवंत मस्के

बीड। प्रतिनिधी

आपल्या बीड जिल्ह्याला जसा संत, महंताचा वारसा आहे तसाच भारतमातेच्या सेवेसाठी तत्पर असणाऱ्या शुर सैनिकांचा हा जिल्हा म्हणून ओळखला जातो. माझे प्राथमिक शिक्षण याच मातीत झाले असून धैर्याने सामोरे जात मी सैन्य दलात भरती झालो. विद्यार्थ्यांनो आपण ज्ञान प्राप्त करा आणि उच्च शिक्षण घेऊन देशसेवेसाठी सैन्य दलात भरती व्हा,कसलिही भिंती मनात बाळगून नका. तेथे आपल्याला देशसेवा करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध असून शिक्षणाबरोबरच शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कौशल्ये जोपासा असे माजी सुभेदार व कमांडो अकॅडमीचे संचालक परमेश्वर गिराम यांनी करिअर मार्गदर्शन करताना आवाहन केले तर आपली शाळा डोंगर पट्टयातील असून या भागातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन देशसेवेसाठी कार्यरत आहेत. बीड जिल्ह्याला संत विचारांचा वारसा असून या जिल्ह्याला देशसेवेबरोबरच शौर्याची परंपरा असल्याचे प्रतिपादन विद्यालयाचे प्रा. धनवंत मस्के यांनी केले.



गुरुवारी बीड तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित पाटोदा बे.माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा बेलखंडी या शाळेत माजी सुभेदार व कमांडो अकॅडमीचे संचालक माननीय परमेश्वरी गिराम यांचे करिअर मार्गदर्शन संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तथा कॉलेजचे प्राचार्य माननीय धनवंत मस्के सर होते. या कार्यक्रम प्रसंगी माननीय परमेश्वर गिराम माजी सुभेदार व कमांडो अकॅडमीचे संचालक हे प्रमुख अतिथी होते. माननीय प्रा. धनवंत मस्के सर यांनी प्रथम त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. माननीय परमेश्वर गिराम सर यांनी विद्यार्थ्यांना पोलीस भरती, वनरक्षक भरती, बीएसएफ भरती, एस आर पी भरती, आर्मी भरती व विविध स्पर्धा परीक्षा बाबतचे अमूल्य असे मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून अनेक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले व विद्यार्थ्यांनीही त्यांना अनेक मनातील प्रश्न विचारले या सर्व प्रश्नांची गिराम सरांनी विद्यार्थ्यांना समाधान कारक उत्तरे दिली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास व प्रेरणा निर्माण झाली. आपणही असेच बनावे व आपले भविष्य घडवावे असा आत्मविश्वास सरांनी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण केला. माननीय धनवंत मस्के सर यांनी अध्यक्ष भाषणामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षांची माहिती सांगितली व माजी सुभेदार गिराम यांना आमंत्रित केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये समाधान दिसत होते. या कार्यक्रमाप्रसंगी गावातील विविध तरुण, युवक, होतकरू तरुण तसेच युवा कार्यकर्ते राहुल भैया वाघमारे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष धनवंत मस्के सर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सरपंच हत्येप्रकरणी बीड जिल्ह्यात कडकडीत बंद

## मास्टरमाईंडसह सर्व आरोपींना अटक करून त्यांना कडक शिक्षा करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष खून प्रकरणी विविध संघटनांच्या वतीने तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत बीड जिल्ह्यातकडकडीत बंद पाळण्यात आला. जिल्ह्यातील बीड, आष्टी, गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, वडवणी, धारूर, पाटोदा, शिरूर आदी ठिकाणी बंद पाळण्यात आला. परळीत मात्र परभणीच्या घटनेच्या निषेधार्थ बंद पाळण्यात आला. बीड शहरासह जिल्हाभरात सर्व ठिकाणी व्यापारी बांधवांसह सर्वांनीच बंदला प्रतिसाद दिला.आरोपींनी तात्काळ अटक करावे, अन्यथा मराठा समाज रस्त्यावर उतरून संपुर्ण महाराष्ट्र बंद करण्याचा इशारा आंदोलकांनी केला. बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला आहे, या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी बंदचे आवाहन केले आहे की शांततेत बंद पाळावा. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा अशी माझी मागणी आहे. मी लोकसभेत आहे त्यामुळे मागणी केली आहे, खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

केज तालुक्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणात निषेध नोंदवण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. संतोष देशमुख यांची हत्या देखील या कंपनीच्या आवारात झालेल्या मारामारीमुळे झाली. यापुढे असे प्रकार टाळायचे असेल तर या प्रकरणात तात्काळ कारवाई करून आरोपींना अटक करावी तसेच पवन चक्की कंपन्यांचे अर्थकारण सर्वसामान्यांना अडचणीचे ठरणार नाही अशा पद्धतीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी सामाजिक संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. या बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणादेखील अलर्ट मोडवर असून राज्य राखीव दलाच्या दोन कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत.याबरोबरच स्थानिक पोलिसांचा देखील ठिकठिकाणी बंदोबस्त वाढवण्यात आला असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली.. तसेच बंदच्या पार्श्वभूमीवर काही जणांना नोटीस देखील बजावली असून नागरिकांनी बंद काळात शांतता राखावी असे आवाहन सचिन पांडकर यांनी केले आहे.



### आ.संदीप क्षीरसागरांचे रॅली काढून बंद पाळण्याचे आवाहन

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येचा व सत्ताधारी आणि प्रशासनाकडून आरोपींना पाठीशी घालण्याच्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला होता. या बंदला जिल्ह्यात सर्वत्र प्रतिसाद मिळाला. बीडमध्ये शुक्रवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी रॅली काढून बीडमध्ये बंद पाळण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बीडमध्ये व्यापारी व नागरिकांनी कडकडीत बंद पाळला.

### मस्साजोग येथील प्रकरणाचा जलद गतीने तपास करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

मस्सा जोग ता. केज जि येथीलमाजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हस्तेच्या अनुषंगाने आज डॉ. श्रीकृष्ण पंचाळ जिल्हाधिकारी बीड यांनी केज येथील तहसील कार्यालयात एक बैठक घेतली व सदर प्रकरणाचा जलद गतीने तपास करण्याचे निर्देश जारी केले.



सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधित आरोपी विरुद्ध कायदेशीर कार्यवाही अनुसरण्याची दक्षता घेण्यात येत आहे तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शांतता राखण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

### अंबाजोगाईत कडकडीत बंद

अंबाजोगाई : मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ अंबाजोगाई शहर व तालुक्यात शुक्रवारी कडकडीत बंद पाळण्यात आला . सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने बंदची हाक देण्यात आली होती.



आज च्या या बंद मध्ये शहरातील विविध व्यवसाय,दुकाने, शाळा, महाविद्यालय बंद ठेवण्यात आले होते. शहरातील व्यापाऱ्यांनी व शालेय शिक्षण संस्थांनी बंद पाळून पुकारण्यात आलेल्या शहर बंदच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. आठवडी बाजारावरही मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला. अनेक शेतकऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आठवडी बाजारास येण्याचे टाळले. शहरात बंद पाळण्यात यावा यासाठी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने दोन दिवसापासून आवाहन करण्यात येत होते. शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून शहरा मधून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान पुकारलेला बंद शांततेत पार पडला.

### हे प्रकरण फास्टट्रॅकवर चालवावे-बजरंग सोनवणे

संतोष देशमुख यांची हत्या प्रकरण हे जिल्ह्याला काळीमा फासणारे आहे. त्यांचा अपहरण करून खून करण्यात आला. ही अतिशय निंदनीय घटना आहे. या घटनेचा मी निषेध करतो आणि आरोपीला अटक केली म्हणजे कुणीतरी साईडचे हिरो आहेत त्यांना अटक करून दाखवायचे म्हणून दाखवल्या आहेत मुख्य आरोपी अद्याप अटक नाहीत. माझा पोलिसांवर भरोसा नाही. मोबाईल सापडले म्हणतात परंतु ते जाहीर करत नाहीत किंवा जवाबत काय म्हटले हे देखील सांगत नाहीत. हे प्रकरण फास्टट्रॅक वर चालवावे त्याला माझे समर्थन आहे परंतु त्या आधी आरोपी अटक करणे गरजेचे आहे. मी या प्रश्नावर अमित शहा यांची भेट घेतली आहे. त्यांना याबाबत माहिती दिली आहे. खोटे गुन्हे दाखल होत आहेत. याची मला सीबीआय चौकशी हवी आहे त्यांना मी या घटनेची पार्श्वभूमी सगळे सांगितले आहे अशी माहिती खासदार बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### सकल मराठा समाज बांधव यांचा सरकारला ईशारा

आष्टी येथे कडकडीत बंद ठेवण्यात आला यावेळी सकल मराठा समाज बांधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत मुख्य आरोपींना अटक करावी, अन्यथा सकल मराठा समाज बांधव रस्त्यावर उतरेल याची सरकारने नोंद घ्यावी आसा ईसारा सकल मराठा समाज बांधव यांनी दिला आहे.

## संतोष देशमुखांच्या हत्त्येच्या निषेधार्थ माजलगाव तालुका कडकडीत बंद



माजलगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बीड जिल्हा बंदला प्रतिसाद देत माजलगाव तालुक्यात कड़कडीत बंद पाळण्यात आला. काही दिवसांपूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या करण्यात आली होती.या निघृण हात्याच्या निषेध म्हणून सकल मराठा समाजाच्या व माजलगाव शहर व तालुक्यातील सर्व जातीच्या नागरिकांच्या वतीने दि १३ डिसेंबर शुक्रवार रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.या बंद मध्ये माजलगाव तालुक्यातील नित्रुड,लोणगाव,मोगरा, गंगामसला सह माजलगाव शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली.तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातही असेच चित्र पाहावयास मिळाले.

## रायमोहा,शिरूर कासार शहर कडकडीत बंद

### आरोपींना तात्काळ अटक करून एसआयटी नेमण्याची मागणी

**शिरूर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या मारेकरांना त्वरित अटक करून एसआयटी नेमण्यासाठी सकल मराठा समाजाने रायमोहा शिरूर कासार शहर बंद ठेवण्याचे आव्हान केले होते. रायमोहा व शिरूर करांनी त्याला प्रतिसाद देत शंभर टक्के बंद पाळला.यावेळी शिरूर शहरांमधून फेरीही काढण्यात आली व पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे.मस्साजोग येथे घडलेल्या घटनेचे पडसाद बीड जिल्ह्यासह राज्यभरामध्ये काही प्रमाणात उमटलेले आहेत.सकल मराठा समाजाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मस्साजोग जि.बीड येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांना अमानुषपणे मारहाण करून हत्या करत आलेले आहे. सरपंचाची झालेली हत्या निषेधार्थ असून या प्रकरणातील सर्वच आरोपींना तात्काळ अटक करावी.तसेच या प्रकरणात दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी व सदर प्रकरणात एसआयटी चौकशी लावण्यात यावी. सदरील प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता हि प्रचंड दहशती खाली असून अशा घटनांमुळे आपल्या बीड जिल्ह्याची बदनामी होत आहे.अशा घटना यापुढे घडू नयेत यासाठी आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही व उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक यांच्याकडे करण्यात आलेली आहे.यावेळी मोठ्या प्रमाणात मराठा सेवक उपस्थित होते.

## वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा चालकाकडून सरपंच राधेश्याम धस यांना जिवे मारण्याचा प्रयत्न

### आष्टी परिसरातील अवैध वाळू उपसा बंद करून साठे जप्त करण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

जामगाव येथील सरपंच राधेश्याम देविदास धस यांनी जामगाव गावातून भरधाव वेगाने, बेफिकिरीने हायवा चालवणाऱ्या चालकाला धोकादायक पद्धतीने वाहन चालवू नको असे सांगितल्यामुळे अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा चालकाने मी असेच वाहन चालवत असतो तू आडवा येऊ नको जीवाला मुकशील असा दम देऊन आठ दिवसानंतर जामगाव ते आष्टा रस्त्यावर जामगाव कडे येत असताना या हायवा चालकाने राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली असून याबाबत आष्टी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे याविषयीचे सविस्तर वृत्त असे की,

दि.४ डिसेंबर २०२४ रोजी सायं. ७.५० वा. भारत बेंझ या कंपनीचा अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा गावातून भरधाव वेगाने सतत जात असतो त्यामुळे गावातील मुलेबाळे आणि नागरिक यांचे जीवाला धोका होऊ शकतो असे गावकऱ्यांच्या समजल्यानंतर या वाहन चालकाला समजावून सांगावे या उद्देशाने सरपंच राधेश्याम देविदास धस यांनी त्याचे वाहन थांबून त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता चालक मन्सूर शेख याने मी हायवा असाच चालवीत असतो, तुला काय करायचे ते कर ?

तू परत मध्ये आला तर तुला चाका खाली घेत असतो, तू जीवाला मुकशील ..अशी दमदाटी केली त्यानंतर दि.१२ /१२/ २०२४ रोजी सायं.६.१५ वा. राधेश्याम धस हे घराकडून त्यांच्या वाहनाने जामगाव कडे येत असता समोरून भारत बेंझ कंपनीचा हायवा क्र. एम एच -१६-- ५५ ८८ हा भरधाव वेगाने येत होता चालकाने राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी त्यांचे वाहन रस्त्याच्या खाली उतरवल्यामुळे ते वाचले.. ही घटना सतीश धस अविनाश धस संभाजी झांबरे त्यांनी समक्ष पाहिली यावेळी या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये आणखी एक अनोळखी इसम उपस्थित होता त्यानंतर सरपंच राधेश्याम धस यांनी आष्टी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून गुन्हा रजि. क्र.०५५१ /दि.१३ /१२ /२०२४ असा असून हायवा चालक मन्सूर शेख आणि एका अज्ञात इसमाविरुद्ध जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने अंगावर वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.. म्हणून भारतीय न्याय संहिता कलम १०९, ३५२, ३५१ (२) ३५१(३), ३ (५ )अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.. दरम्यान.. आष्टी परिसरातील अनेक गावांमधील नदीतील अवैध वाळू उपसा बंद करण्यात यावा आणि त्या ठिकाणी असलेले वाळूचे साठे जप्त करण्यात यावेत अन्यथा दिनांक २० /१२ /२०२४ रोजी तहसील कार्यालय आष्टी येथे उपोषण आंदोलन करण्यात येईल असे निवेदन

रामहरी पांडुरंग धुमाळ जळगाव, प्रशांत प्रकाश श्रीखंडे मांडवा, श्रीपाद राजेंद्र बन आणि अमोल ज्ञानेश्वर बन कासारी, निखिल रंगनाथ धोंडे, आकाश दत्तात्रय ढेंगे, परीक्षित प्रदीप काकडे आष्टी, संतोष बाळू पवार शिदेवाडी, अमोल पांडुरंग भोसले पिंपरी, वैभव बाबासाहेब सांगळे कऱ्हेवडगाव, निलेश नामदेव राऊत वाळुंज, आणि महेश दासा रणसिंग जामगाव, यांनी एका निवेदनाद्वारे इशारा दिला आहे

## सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी म्हणून पाटोदा कडकडीत बंद



**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्या मधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची आरोपीने अमानुषपणे मारहाण करून क्रूरपणे हत्या केलेली आहे तरी सरपंच संतोष देशमुख यांचे मारेकरी असणारे आरोपी सुदर्शन घुले, विष्णु चाटे व इतर आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी पाटोदा तालुका कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला या निषेध मोर्चात मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## अंबड गट विकास अधिकाऱ्याचा चार्ज प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकाऱ्यांकडे

जालना । प्रतिनिधी

बाहेर राज्यातील प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी म्हणून जालना जिल्हाधिकारी कार्यालय इथे हजर झाले आहे परंतु त्यांच्याकडे अंबड पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून चार्ज देण्यात आला आहे परंतु सदरील प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी यांचे पद सर्वात मोठे असतात परंतु प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी यांना मराठी हिंदी भाषा सरळ येत नसल्याने ग्रामीण भागातील येणारे नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाली आहे. अशी चर्चा पंचायत समिती अंबड परिसरात सुरू आहे.याप्रकरणी भोकरदन चे गटविकास अधिकारी श्री राजपूत हे येणार असून परंतु अद्याप पर्यंत ते हजर झाले नाही असे बोलल्या जात आहे. यामुळे पंचायत समिती अंतर्गत विकास कामांमध्ये विकास कामांमध्ये अडथळा निर्माण होत आहे. प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी बाहेर राज्यातील असल्यामुळे त्यांची भाषा पंचायत समिती कार्यालयांमधील कर्मचारी अधिकारी शिपाई यांना काही समजत नसून असे बोलल्या जात आहे.

## जालना बाजार समिती अंतर्गत कापूस खरेदी केंद्र सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना कृषि उत्पन्न बाजार जालनाचे कार्यक्षेत्रातील लक्ष्मी कॉटस्पीन, सामनगांव येथे सी.सी.आय.च्या कापूस खरेदीस सुरुवात करण्यात आली आहे.

आज दि.१३.१२.२०२४ शुक्रवार रोजी जालना बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील लक्ष्मी कॉटस्पीन, सामनगांव येथे भारतीय कपास निगम (सी.सी.आय.) ची कापुस खरेदीचा शुभारंभ बाजार समितीचे सचिव मोहन राठोड यांच्या हस्ते पुजा करुन शुभारंभ करण्यांत



आला. या ठिकाणी प्रथम कापुस विक्री करिता आलेले शेतकरी श्री. विष्णू बापुराव पवार, खणेपुरी यांचा सचिव मोहन राठोड यांनी शाल, श्रीफळ देवुन सत्कार केला त्यांनी आणलेला कापसास रु.७४२१/ - या भावाने सी.सी.आय. ने खरेदी केला.

याप्रसंगी बाजार समितीचे सचिव श्री. मोहन राठोड, सहा. सचिव श्री. अनिल खंडाळे, सहा. सचिव भरत तनपुरे यांचा सत्कार लक्ष्मी कॉटस्पीनचे श्री. रमेश मुंदडा यांनी केला सी.सी.आय.चे केंद्र प्रमुख श्री. महेंद्र पटेल, डी. डी. सोळंके व साहिल पटेल यांचाही सत्कार श्री. रमेश मुंदडा यांनी केला. यावेळी बाजार समितीचे पर्यवेक्षक संजय जाधव, कर्मचारी श्री. गजानन काजळकर यांच्या सह शेतकरी, व्यापारी, हमाल व इतर बाजार घटकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## बीडमध्ये जुन्या वादातून गोळीबार, १२ राऊंड फायर केले

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या, परळीतील व्यापाऱ्याचे झालेले अपहरण यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असतानाच काल मध्यरात्री बीड शहरातील बार्शी नाका परिसरात विश्वास दादाराव डोंगरे (वय ४५, रा. इमामपुर रोड) याच्यावर गोळीबार झाला. गोळीबारात डोंगरे हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथे हलविण्यात आले आहे. या गोळीबारात तब्बल १२ राऊंड फायर करण्यात आल्याची माहिती पोलिस सुत्रांनी दिली आहे. पेठ बीड ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुदीराज यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक जखमीचा जबाब घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे गेले होते. जखमी डोंगरे यांने जबाबात सहा जणांची नावे पोलिसांनी दिली आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नारायणगावातील ७९ जणांची साडेसात कोटींची फसवणूक, दोघांवर गुन्हा दाखल

**नारायणगाव । प्रतिनिधी**

पीएलसी अल्टिमा या कंपनीत पैसे गुंतवणूक केल्यास जास्तीत जास्त परतावा मिळेल, असे आमिष दाखवून नारायणगाव व परिसरातील ७९ गुंतवणूकदारांची ७ कोटी ६७ लाख ९४ हजार ३०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले आहेत, अशी माहिती नारायणगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली. या प्रकरणी गुंतवणूकदार नितीन रावजी शेळके (रा. नारायणगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नितीन बाळासाहेब पोखरकर (वय ४१, रा. वळणवाडी-वारूळवाडी, नारायणगाव, ता. जुन्नर), राजेंद्र सूर्यभान उपाध्ये (वय ४२, रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांच्यावर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत फिर्यादीत म्हटले आहे, पीएलसी अल्ट्रा कंपनीत गुंतवणूक केल्यास जास्तीत जास्त परतावा मिळेल व वर्षाच्या शेवटी गुंतवणूक केलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम मिळेल,



अशी हमी नितीन पोखरकर यांनी शेळके यांच्यासह गुंतवणूकदारांना दिली होती. यावर विश्वास ठेवून शेळके यांनी नितीन पोखरकर यांच्या सूचनेनुसार एप्रिल २०२२ मध्ये दहा लाख रुपये राजेंद्र उपाध्याय यांच्या नावाने संगमनेर (जि. अहिल्यानगर) येथील एका खासगी बँकेत श्रीकृष्ण कॅटल अँड पोल्ट्री फीड नावाने असलेल्या खात्यामध्ये ऑनलाइन भरले. तसेच पाच लाख रुपये रोख नितीन पोखरकर यांच्याकडे नारायणगाव येथे दिले. पोखरकर यांच्या सूचनेनुसार एकूण १५ लाख रुपयांची गुंतवणूक शेळके यांनी केली. त्यानंतर पोखरकर यांनी ही रक्कम पीएलसी अल्टिमा नावाच्या मोबाईल पद्वारे डॉलरमध्ये कन्व्हर्ट करून बिटकॉइनमध्ये गुंतवणूक केली आहे. याचप्रकारे पोखरकर यांच्या सूचनेनुसार शेळके यांच्यासह नारायणगाव परिसरातील सुमारे ७९ जणांनी मागील तीन वर्षांत ७ कोटी ६७ लाख ९४ हजार ३०० रुपयांची गुंतवणूक केली आहे. दिलेल्या आश्वासनानुसार परतावा न मिळाल्याने शेळके यांनी गुंतवणूक केलेली १५ लाख रुपये पोखरकर यांच्याकडे मागितले असता, त्यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. पैसे मिळणार नाहीत. तुम्ही राजेंद्र उपाध्ये यांच्या बँक खात्यावर पैसे जमा केले आहेत. त्यांच्याकडे पैसे मागा, असे म्हणून पोखरकर यांनी शिवीगाळ केली. पुन्हा पैसे मागितले तर जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद शेळके यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात दिली आहे.

गुंतवणुकीची व्याप्ती मोठी

नारायणगाव पोलिसांनी तक्रारदारांकडे चौकशी केली असता नारायणगाव परिसरातील नागरिकांनी सुमारे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. यामध्ये काही शासकीय कर्मचारी व महिलासुद्धा आहेत. जास्त व्याजाच्या लोभापायी काही शेतकऱ्यांनी पतसंस्थांमधून कर्ज काढून गुंतवणूक केली आहे. पोखरकर यांनी आता हात वर केल्यामुळे गुंतवणूकदार मानसिक तणावाखाली आहेत. या पैकी ७९ गुंतवणूकदारांनी तक्रार केली आहे.

# मावळच्या मातीत अनुभवायला मिळणार रायडर्सच्या 'डर्ट-रेसिंगचा' थरार

**पुणे । प्रतिनिधी**

फेडरेशन ऑफ मोटर स्पोटर्स क्लब्स ऑफ इंडिया (एफएमएससीआय) या भारतातील मोटर स्पोर्ट्सच्या राष्ट्रीय प्रशासकीय संस्थेच्या मान्यतेखाली होणार्या इंडियन नॅशनल रॅली स्प्रिंट चॅम्पियनशीप स्पर्धेची अंतिम फेरी कामशेतजवळ नाणोली येथे होणार आहे. भारतातील अव्वल आणि सर्वोत्तम रायडर्स या राष्ट्रीय विजेता ठरवणार्या फायनलमध्ये सहभागी होणार असून या टु-व्हिलरच्या डर्ट-रेसचा थरार अनुभवता येणार आहे. रॅली रेसिंगसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही

या स्पर्धेबाबत माहिती देताना एफबी मोटरस्पोटर्सचे संचालक फराद भाथेना आणि चिन्मयी भाथेना यांनी सांगितले की, २०२४ मध्ये देशातील विविध राज्यांमध्ये झालेल्या ५ प्राथमिक फेर्यांनंतर या स्पर्धेची अंतिम फेरी १४ आणि १५ डिसेंबर रोजी नाणोली स्पीड-वे फार्म्स येथे होणार आहे. या फायनल राऊंडसाठी प्रत्येक झोनमधून पात्र झालेले सुमारे १५० अव्वल रायडर्स सहभागी होणार आहेत. फराद म्हणाले की, माझे आई-वडील, बहीण आणि भाऊ असे संपूर्ण कुटूंबच रेस आणि रॅली करत असून माझे हे कुटूंब मोटरस्पोटर्स आयकॉन्स् म्हणून ओळखले जाते.



भारत आणि दक्षिण-पुर्व आशियातील २०० हून अधिक रॅली आणि शर्यतींमध्ये भाग घेतला आहे. बीबीसी टॉप गीअर इंडिया यांनी देशातील आतापर्यंतच्या १० सर्वोत्तम ड्रायव्हर्समध्ये स्थान दिले आहे. राष्ट्रीय चॅम्पियन ठरलेले सचिन डी., नटराज, असद खान, रेहाना, सिनान फ्रान्सीस, राजेंद्र, स्टेफन रॉय, शामिम खान आणि सय्यद असिफ अलि हे विजेतेपदासाठी झुंझणार आहेत. याशिवाय सुहैल अहमद, युवा कुमार, अमोद नाग, मुंबईचा बादल दोशी, पुण्यातील पिंकेश ठक्कर, हंसराज साईकिया, मधुरीया ज्योती राभा, बंटेलांग जयव्रा असे अव्वल आणि सर्वोत्तम १५० हून अधिक रायडर्स सहभागी होणार आहेत. असे फराद आणि चिन्मय यांनी सांगितले.

अशी असते स्पर्धा

इंडियन नॅशनल रॅली स्प्रिंट चॅम्पियनशीप स्पर्धेत प्रत्येक टप्पा ६ ते १० किलोमीटरचा असतो. यामध्ये रायडर्स मातीच्या, डांबरी ट्रकवर किंवा डोंगरातील उंच-सखल खडतर अशा रेसिंग मार्गावर आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करत अंतिम रेषा गाठतात. हाय-स्पीड घेण्यासाठी उत्तम असा सरळ रस्ता किंवा वेड्यावाकड्या वळणांचा घाट रस्ता, या मार्गावरून अचूक नियंत्रण, हवेतून उंच उडी मारून पुन्हा नियंत्रण मिळवणे अशा अनेक आव्हानांचा यशस्वी सामना करून रायडर्स आपली रेस पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रॅली स्प्रिंटमध्ये बाईक्सच्या विविध श्रेणींचा समावेश आहे. विशेषकरून सुधारित बाईक्सपासून ते स्ट्रीट बाईक्सपर्यंत रायडर्स वेगवेगळ्या गटात स्पर्धा करतो.

# घोडेगावात बैलगाडा शर्यत

**आंबेगाव । प्रतिनिधी**

घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे शनिवार, दि. १४ व रविवार दि. १५ डिसेंबर रोजी दत्तजयंती उत्सवानिमित्त बैलगाडा शर्यतीचा थरार रंगणार आहे. सद्गुरू सेवा मंडळ व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गेली ४५ वर्षे ही बैलगाडा शर्यत सुरू असून, या वर्षी स्पर्धेचे ४६वे वर्ष असल्याचे सद्गुरू सेवा मंडळाचे अध्यक्ष कैलासबुवा काळे यांनी सांगितले.



प्रथम क्रमांकाला १ लाख १ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकाला ५१ हजार रुपये, चतुर्थ क्रमांक २५ हजार रुपये तसेच दोन्ही दिवशी पहिल्यात पहिल्या येणार्या बैलगाड्यास एलईडी टीव्ही, दुसर्यात पहिला येणार्या गाड्यास जुंपता गाडा, तिसर्यात पहिला येणार्या गाड्यास सायकल, चौथ्यात पहिला येणार्या गाड्यास कुलर व घाटाच्या राजास १० हजार रुपये व चषक, सलग ३ वर्षे प्रथम येणार्या बैलगाड्यास दुचाकी व रोख रक्कम, तिसर्या वर्षाच्या मानकर्यांमध्ये सर्वात आतून येणार्या बैलगाड्यास ११ हजार रुपये विभागून दिले जाणार आहेत. ४० फुटांवरून कांडे प्रथम येणार्यास ११ हजार रुपये, पहिल्यात शेवटी येणार्या बैलगाड्या ४ हजार रुपये अशी बक्षिसे दिली जाणार आहेत. घोडेगाव पंचक्रोशीतील सर्व गाडामालक यांच्याकडून दत्तजयंती यात्रोत्सवासाठी १ लाख ५१ हजार रुपयांची देणगी देण्यात येणार आहे. यात्रेनिमित्त भवानीमाळ, काळेवाडी, धोंडमाळ, शिंदेवाडी, कोळवाडी, कोटमदरा, कोलदरा, घुलेवाडी, दरेकरवाडी, इनामवस्ती, गोनवडी, परांडा, सालोबामळा, घोडेगाव ग्रामस्थ, वसई शेतमालक व श्री मुकाईदेवी नवरात्र उत्सव मंडळ यांचे सहकार्य आहे. तसेच शनिवारी दत्तमंदिरामध्ये दत्तजन्माचे कीर्तन ह.भ.प. तानाजी महाराज सावंत यांचे होणार आहे. तर दत्तमंदिरातील पूजा, आरती व्यवस्था धार्मिक मित्रमंडळ करत असल्याचे सद्गुरू सेवा मंडळाचे अध्यक्ष काळे यांनी सांगितले.

# पुण्यात चार ठिकाणी आगीच्या घटना ; एकाचा मृत्यू

***पुणे । प्रतिनिधी***

दुपारनंतर पुण्यात चार ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. त्यापैकी एका घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. दुपारी एक ते तीन या वेळेच्या दरम्यान येवलेवाडी, मिठानगर, शिवाजीनगर, लक्ष्मीनगर येथे आगीच्या घटना घडल्या.

दुपारी ०१३१ वाजता कोंढवा बुद्रुक : येवलेवाडी येथे एका सोफा बनविणारया कारखान्यात आग लागली असता कोंढवा बुद्रुक, कोंढवा खुर्द व एक वॉटर टँकर रवाना होत आग आटोक्यात आणली. परंतु, सदर घटनास्थळी एका छोट्या सिलेंडरचा स्फोट झाला होता तसेच त्याठिकाणी वेल्डिंग करण्याचे ही काम सुरु असल्याचे तेथील नागरिकांनी सांगितले. जवानांनी इतर ठिकाणी आग पसरु



न देता पाण्याचा मारा करत सुमारे तासाभरात आग पूर्ण विझवली. या घटनेत एक इसम (हरुण हमद खान, वय ४५) हे गंभीररित्या भाजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने त्यांना जवानांनी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात रवाना केले होते. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. दुपारी ०२३२ वाजता कोंढवा : मिठानगर येथे इमारतीच्या आवारातील इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मरने मोठ्या प्रमाणात पेट घेतला होता. कोंढवा खुर्द येथील अग्निशमन वाहन दाखल होत त्यांनी आगीवर वेळेत नियंत्रण मिळवत पुढील धोका टाळला. जखमी कोणी नाही. दुपारी ०२५० वाजता शिवाजीनगर : संचेती हॉस्पिटल नजीक बंद असलेल्या एका घराला (कौलारु+लाकडी) आग लागल्याची वर्दी मिळताच दलाकडून कसबा व नायडू अग्निशमन केंद्र व एक वॉटर टँकर दाखल होत जवानांनी पाण्याचा मारा करीत आग पूर्ण विझवली. आगीचे नेमके कारण समजू शकले नसून जखमी कोणी नाही. दुपारी ०२५२ वाजता येरवडा : लक्ष्मीनगर, मोझे शाळेजवळ एका घरामध्ये आग लागल्याचे कळताच येरवडा व धानोरी येथील अग्निशमन वाहन रवाना केले. जवानांनी पहिल्या मजल्यावर आग लागल्याचे दिसून येताच तातडीने पाण्याचा मारा सुरू करत दाटीवाटीच्या वस्तीत आग इतरत्र पसरणार नाही याची दक्षता घेत आग पुर्ण विझवली. आगीचे कारण समजले नसून जखमी कोणी नाही. आगीमध्ये मोठे नुकसान झाले असून घरातील सर्व साहित्य जळाले आहे.

# नदीपात्रात अडथळा ठरणारा पूल पाडणार

**पुणे । प्रतिनिधी**

मुठा नदीपात्रात तब्बल ५५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला ओंकरेश्वर मंदिर ते रिद्धेश्वर-सिद्धेश्वर घाटाला जोडणारा जुना पूल (कॉजवे) अखेर पाडण्यात येणार आहे. हा पूल धोकादायक झाला असून, पावसाळ्यात मुठा नदीपात्रातील पाण्याला हा पूल अथडळा ठरत आहे. या बाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या प्रकल्प विभागाने शहर सुधारणा समितीत ठेवला आहे.



स्थायी समिती आणि मुख्यसभेची मान्यता घेऊन हे काम केले जाणार आहे. या पुलाची लांबी ५० मीटर, तर रुंदी अवघी ४.७ मीटर आहे. या पुलाचा वापर स्थानिक नागरिक नदी ओलांडणे, वाहने धुणे, मासे पकडणे, प्राण्यांची स्वच्छतेसाठी करतात. वाहतुकीसाठी या पुलाचा वापर होत नाही. मात्र, दरवर्षी या पुलामुळे जलपर्णी आणि कचरा अडकला जातो. हा पूल जीर्ण झाला असून तो वाहतुकीसाठी सुरक्षित नाही. त्यावर वारंवार खड्डे पडत असून त्याच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या पुलाचे ऑडिट केले होते. त्यात या पुलाची दुरुस्ती केल्यास ३९ लाखांचा खर्च अपेक्षित आहे. दुरुस्तीनंतर त्याचे आर्युमान केवळ ८ वर्षे वाढणार आहे. मात्र, त्याचा वापर केवळ दुचाकीसाठी होणार आहे. या पुलाच्या बांधकामानंतर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल आणि जयंतराव टिळक पूल बांधण्यात आला. हे दोन्ही पूल वापरत असल्याने तसेच दुरुस्तीनंतर कॉजवे'चा फारसा वापर होणार नसल्याने हा पूल पाडला जाणार आहे.

नदीकाठ विकसन प्रकल्पाला फायदा

हा पूल पाडल्यानंतर त्याचा फायदा महापालिकेच्या नदीकाठ विकसन प्रकल्पासह पूरस्थितीच्या काळातही होणार आहे. नदीत सर्वांत कमी उंची असलेल्या या पुलाच्या खांबाला जलपर्णी तसेच कचरा अडकतो. परिणामी, पावसाळ्यात पाण्याला मार्ग मिळत नाही. त्यामुळे नदीतील अडथळे काढण्यासाठीही पालिका उपाययोजना करत आहे. त्यात या कामाचा फायदा होणार आहे.

# वाघोली गोळीबार प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल; तिघांनाही दारूचे व्यसन, दोन जण ताब्यात




**पुणे । प्रतिनिधी**

घटनेची माहिती कळताच वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाड कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहचले. त्यांनी विशाल व अमोल याला तत्काळ ताब्यात घेतले. विशाल याच्या घराची झडती घेतली असता १६ जिवंत काडतुसे व दोन रिकामे काडतुसे आढळून आले. पोलिसांनी घरातील काडतुसे, त्याच्याकडील रिव्हॉल्वर त्यातील तीन जिवंत काडतुसे, तीन रिकामे काडतुसे, एक थार वाहन व एक कार जप्त केली आहे. पुढील तपास वाघोली पोलीस करीत आहेत.दारूचे व्यसन सुटावे यासाठी संदीप याला कुटुंबीयांनी लोणी काळभोर येथील व्यसनमुक्ती केंद्रात पाठविले होते. मात्र तेथून तो दोन वेळा निघून आला होता. तो इकडे येवून पुन्हा दारू पित होता व कुटुंबियांना त्रास देत होता. गुरुवारी त्याच्या पत्नीने पुन्हा व्यसनमुक्ती केंद्राला फोन करून त्याला नेण्यास सांगितले. यासाठी केंद्रातील कर्मचारी त्याला नेण्यासाठी आले होते. मात्र दारूच्या नशेत तिघांनी हा धिंगाणा करत गोळीबार केला

# मला आमदार झाल्या सारख वाटतय' फेम गायकावर कौटुंबिक हिंसाचार प्रकरणी गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

मला आमदार झाल्यासारखं वाटतय या गाण्याचे गायक संकल्प अजाबराव गोळे (रा. अद्विका रेसिडेन्सी, पुनावळे, पिंपरी-चिंचवड, पुणे ) यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांविरोधात बारामती शहर पोलिस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी त्यांची पत्नी मिनल संकल्प गोळे यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पती संकल्प गोळे, सासू शोभा अजाबराव गोळे, सासरे अजाबराव मारुती गोळे, नणंद समिक्षा अजाबराव गोळे, दिक्षिता स्वप्निल जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ५ फेब्रुवारी २०२३ ते २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ही घटना घडली. मिनल व संकल्प यांचा विवाह काळज (ता. फलटण, जि. सातारा) येथे ५ फेब्रुवारी २०२३ रोजी झाला. लग्नानंतर एक महिना संसार व्यवस्थित सुरु होता. परंतु त्यानंतर पती संकल्प हे दारु पिवून येत तिच्यावर संशय घेवू लागले. तु काम व्यवस्थित



करत नाही, तु कोणाबरोबरही चॅटींग करते, बोलते. तुला घरकाम येत नाही. तु तुझे बारामतीतील मेडिकल शॉप बंद करून पुणे येथे सुरु कर अन्यथा तुला नांदवणार नाही, असे ते म्हणत. शिवाय तुला नांदवायचे नाही, तू मला घटस्फोट दे, असे म्हणत तिला हाताने मारहाण, शिवीगाळ, दमदाटी केली जात होती. सासू शोभा यांनी 'तू मला उलट बोलतेस, तुला नांदवायचे नाही' असे म्हटले. तर 'समिक्षाच्या लग्नासाठी दहा तोळे दागिने माहेरहून आण' अशी मागणी सासूने केली. सासरे यांनीही मेडिकल शॉप पुण्यात सुरु करण्यासाठी माहेरहून दहा लाख रुपये आण असे म्हणत उपाशीपोटी ठेवून शारिरिक व मानसिक छळ केला. नणंद समिक्षा व दिक्षिता यांनीही सतत शिविगाळ, दमदाटी केली. लग्नावेळी घातलेले दागिने सासरच्या मंडळींनी काढून घेत तिला फेब्रुवारी २०२४ मध्ये राहत्या घरातून हाकलून दिले. त्यामुळे फिर्यादीने बारामतीत बहिणीच्या घरी आसरा घेतल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# बहीण-भावाचे अपहरण करून मारहाण

**पुरंदर । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील पारगावजवळ चार अनोळखी व्यक्तींनी बहीण-भावाचे अपहरण करून मारहाण केल्याची घटना घडली, जेजुरी पोलीस ठाण्यामध्ये याबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी चार तासांत चौघा आरोपींना जेरबंद केले असल्याचे जेजुरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी सांगितले.

या प्रकरणी तेजस कर्हाडे (वय २४), संतोष कर्हाडे (वय ४६), समीर दिवसे (वय २६, रा. हिवरकर मळा, सासवड) व गणेश कैलास चिव्हे (वय २४) या आरोपींना जेजुरी पोलिसांनी अटक केली आहे. जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी हे आपल्या बहिणीसह बुधवारी (दि.११) सायंकाळी साडेसातच्या सुमारास पारगाव येथे बाजारात पावटा विकून घरी दुचाकीवरून जात असताना, पारगाव गावाजवळ या चार आरोपींनी चारचाकी वाहन रस्त्यामध्ये आडवी मारून रस्ता अडवून या दोघांना आमचे दोन किलो सोने द्या, नाहीतर तुम्हाला व तुमच्या आई-वडिलांना मारून टाकीन, अशी धमकी देऊन फिर्यादी व त्याच्या बहिणीला जबरदस्तीने चारचाकी वाहनात घेऊन दोघांचा खून करण्याच्या उद्देशाने पारगाव मार्गे वनपुरी येथे जबरदस्तीने नेले. दरम्यानच्या काळात गाडीत फिर्यादी व त्याच्या बहिणीस लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केली व वनपुरी हद्दीत सोडून दिले. या बाबत फिर्याद जेजुरी पोलिस ठाण्यामध्ये दाखल झाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, महेश पाटील, हवालदार दशरथ बनसोडे, संजय ढमाळ, प्रसाद कोळेकर यांनी चार तासांत आरोपींना जेरबंद केले. आरोपींना सासवड न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे.

# पुण्यात १११ वर्षे जुनी, साडे तीन किलो सोन्याची श्री दत्त मूर्ती; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**पुणे । प्रतिनिधी**

सोनं हा सगळ्यात महागडा धातू समजला जातो, त्यामुळे सोन्याचा वापर करुन मौल्यवान वस्तू बनवतात. अनेकदा सोन्याच्या कलाकारीत देवांच्याही मूर्ती घडवल्या जातात. अशीच एक तब्बल १११ वर्षे जुनी गोल्डन दत्त मूर्ती समोर आली आहे. पुण्यातील बाजीराव रस्त्यावरील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये १११ वर्षे जुनी सोन्याच्या दत्ताची मूर्ती पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाल्याचं चित्र आहे. येथे १११ वर्षांपूर्वी कोलकत्तावरुन आलेल्या एका भक्ताने पुण्यातील श्री समर्थ सद्गुरु नारायण महाराज ट्रस्टला ही साडेतीन किलो सोन्याची दत्ताची मूर्ती भेट म्हणून दिली होती. मात्र, ही मूर्ती कुठेही बाहेर ठेवली तर ती तिच्या



सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे श्री सद्गुरु नारायण महाराज दत्त संस्थान ट्रस्टकडून ही मूर्ती गेले ६० वर्षांपासून बँक ऑफ महाराष्ट्राच्या लॉकरमध्ये ठेवण्यात आली आहे. दत्त जयंतीच्या निमित्ताने ही मूर्ती लॉकरमधून बाहेर काढण्यात आली असून भाविकांनी गोल्डन मूर्ती पाहणीसाठी व दर्शनासाठी गर्दी केली आहे.

बाजार भावानुसार सध्या सोनं ८० हजार रुपये तोळा म्हणजेच १० ग्रॅम सोन्याची किंमत ८० हजार असून १०० ग्रॅम सोन्याची किंमत ८ लाख रुपये होते. या बाजार मुल्यानुसार १ किलो सोन्याची किंमत ८० लाख रुपये होते. त्यामुळे, सोन्याच्या वस्तू किंवा मूर्तीचं संरक्षण ही मोठी जबाबदारी असते. म्हणूनच, त्यामुळे श्री सद्गुरु नारायण महाराज दत्त संस्थान ट्रस्टकडून ही साडे तीन किलो सोन्याची श्री दत्त यांची मूर्ती लॉकरमध्ये ठेवली जाते. दरवर्षी दत्त जयंतीच्या पूर्वी असलेल्या गुरुवारी ही मूर्ती याच बँकेमध्ये भाविकांच्या दर्शनासाठी ठेवली जाते. आज त्याच निमित्ताने लोकांनी या सुंदर दत्ताच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. इतर वेळेस बँकेत लोकांची गर्दी त्यांच्या व्यवहार किंवा पैसे काढण्यासाठी असते. मात्र, आजची ही गर्दी फक्त दत्त महाराजांच्या दर्शनासाठी होती.

किंमत ३ कोटींच्या घरात

या साडेतीन किलो सोन्याच्या दत्ताच्या मूर्तीची किंमत कोट्यावधी रुपये आहे. बाजार भावानुसार जवळपास २ कोटी ८० लाख रुपयांपर्यंत ही किंमत जाऊ शकते. त्यामुळे, या सोन्याच्या मूर्तीची विशेष सुरक्षा बाळगण्यात येते. श्री दत्त जयंतीच्या निमित्ताने वर्षातून फक्त एकच दिवस ही मूर्ती लोकांच्या दर्शनासाठी बाहेर काढली जाते. त्यानंतर, पुन्हा एकदा ती याच बँक ऑफ महाराष्ट्राच्या लॉकरमध्ये ठेवलेली असते. त्यामुळे, वर्षातून एकदाच दर्शन देणाऱ्या दत्त महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची बँकेत गर्दी होते.